POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028
RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक
# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक
○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१९७ ● मुंबई, बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## एमएमआरडीएचा ४८०,०००,०००,००० अर्थसंकल्प

### मेट्रो, पॉड टॅक्सी, बोट टॅक्सी, मल्टीमोडल कनेक्टिव्हिटी, फ्लायओव्हर, अंडरग्राउंड रस्ते आणि...

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १६० वी वार्षिक सर्वसाधारण सभा आज पार पाडली. या बैठकीत नऊ वर्षानंतर पहिल्यांदाच प्राधिकरणाने १७ लाखांचा शिलकी अर्थसंकल्प सादर केला असून मुंबई आणि परिसराच्या पायाभूत सुविधांच्या कामांसाठी ४८ हजार कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पास आज मंजूरी देण्यात आली आहे.

आजच्या बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पातील ७५ टक्के खर्च हा रस्ते, मेट्रो, उड्डाणपुल, बोगदे, बाह्यमार्ग यांसारख्या विकासकामांवर खर्च होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.



उपमुख्यमंत्री तथा एमएमआरडीएचे अध्यक्ष एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत १६० वी वार्षिक सर्वसाधारण सभेची बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नविन सोना, एमएमआरडीएचे आयुक्त संजय मुखर्जी, अतिरिक्त आयुक्त अश्विन मुदगल, विक्रमकुमार आदी अधिकारी उपस्थित होते.

त्यासोबतच एमएमआर परिसर वाहतूक कोंडी मुक्त करण्यासाठी आणि भविष्यातील पाणी नियोजनासाठी 'पोशीर' आणि 'शिलार' या दोन्ही धरणांच्या कामांना तातडीने गती देणे, जुन्या धरणांची उंची वाढवणे, पाणी पुरवठ्यातील तूट भरून काढणे याला प्राधान्य देण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

लास्ट माईल कनेक्टिव्हिटीसाठी बीकेसीमध्ये पॉड टॅक्सी सेवा तर ठाणे व मीरा-भाईंदर येथे बोट टॅक्सीचा प्रयोग केला जाणार आहे. मेट्रो-बस-जलवाहतूक यांची एकत्रित जोडणी करून प्रवास अधिक जलद करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी डबल डेकर फ्लायओव्हर, अंडरग्राउंड टनेलिंग प्रकल्प, कोस्टल रोड आणि भिवंडी-नाशिक मार्गावरील पर्यायी रस्ते उभारले जाणार आहेत.

यासोबतच मुंबईतील एलफिन्स्टन पुलाचे काम गणेशोत्सवापूर्वी पूर्ण करण्याचे आणि घोडबंदर रोडवरील रस्ता रुंदीकरणाचे काम महिनाभरात पूर्ण करण्यात येणार असल्याचे या बैठकीत निश्चित करण्यात आले आहे.

**७ लाखांचा शिलकी अर्थसंकल्प :**
नऊ वर्षानंतर पहिल्यांदाच प्राधिकरणाने १७ लाखांचा शिलकी अर्थसंकल्प सादर केला असून शिलकी अर्थसंकल्प सादर करणारी ही देशातील महत्वाची संस्था असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. आजच्या बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पातील ७५ टक्के खर्च हा रस्ते, मेट्रो, उड्डाणपुल, बोगदे, बाह्यमार्ग यासारख्या विकासकामांवर होणार असल्याचे त्यांनी सांगितले. एमएमआर क्षेत्रातील नागरिकांची पाण्याची समस्या सोडवण्यासाठी उपमुख्यमंत्र्यांनी युद्धपातळीवर पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत. प्रदेशातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी पोशीर' आणि 'शिलार' या दोन्ही धरणांच्या कामांना तातडीने गती देण्याचे निर्देश श्री. शिंदे यांनी यावेळी दिले.

**शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अर्थसंकल्पात भरघोस तरतूद :**
शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अर्थसंकल्पात भरघोस तरतूद करण्यात आली आहे. एमएमआर क्षेत्रातील वाढती वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी ३३७ किमी मेट्रो जाळ्यासोबत पॉड टॅक्सी, बोट टॅक्सी, मल्टीमोडल कनेक्टिव्हिटी, फ्लायओव्हर, अंडरग्राउंड रस्ते आणि मोठ्या पायाभूत प्रकल्पांचा एकत्रित आराखडा राबवण्यात येत असल्याची माहिती उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. मेट्रो नेटवर्कसाठी १३ हजार ८३८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये मेट्रो मार्ग ४, ६, ५, २ ब आणि मार्ग १२ या प्रकल्पांना वेग देण्याचे त्यांनी सांगितले. एमएमआर क्षेत्रातील सर्व प्रमुख मनपांचा मिळून नीती आयोगाच्या मदतीने एक 'बृहद आराखडा' तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

**बीकेसीमध्ये पॉड टॅक्सी सेवा तर ठाणे एउा मीरा-भाईंदर येथे बोट टॅक्सी :**
लास्ट माईल कनेक्टिव्हिटीसाठी बीकेसीमध्ये पॉड टॅक्सी सेवा तर ठाणे व मीरा-भाईंदर येथे बोट टॅक्सीचा प्रयोग केला जाणार आहे. मेट्रो-बस-जलवाहतूक यांची एकत्रित जोडणी करून प्रवास अधिक जलद करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी डबल डेकर फ्लायओव्हर, अंडरग्राउंड टनेलिंग प्रकल्प, कोस्टल रोड आणि भिवंडी-नाशिक मार्गावरील पयार्यी रस्ते उभारले जात आहेत. ट्रॅफिक ब्लॅकस्पॉट ओळखण्यासाठी स्वतंत्र अभ्यासही करण्यात येणार आहे. मुंबईतील एलफिन्स्टन पुलाचे काम गणेशोत्सवापूर्वी पूर्ण करण्याचे आणि घोडबंदर रोडवरील रस्ता रुंदीकरणाचे काम महिनाभरात पूर्ण करण्याचे त्यांनी सांगितले.

**रमाबाई आंबेडकर नगर १७ हजार घरांच्या प्रकल्प :**
मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी महत्वाचे पाऊल उचलले असून एमएमआरडीएच्या माध्यमातून रमाबाई आंबेडकर नगर येथील १७ हजार घरांच्या प्रकल्पाचे काम करण्यात येत आहे. या प्रकल्पाला गती देण्यासाठी एसआरएकडून नोडल अधिकारी नेमण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. मुंबईत १७ प्रकल्पांची यादी तयार असून ठाण्यात पाच इमारतींच्या प्रकल्पांचे काम सुरू आहे. रस्ते, मेट्रो, धरण यासोबतच एमएमारडीएच्या माध्यमातून चांगली घरे देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**मेट्रो दुर्घटनेची गंभीर दखल :**
मुलुंडमधील दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर सर्व प्रकल्पांचे सुरक्षा व स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला असून 'दक्षता पथके' नेमून दररोज नियंत्रण आणि अधिकाऱ्यांनी क्षेत्र भेटी कराव्यात. हलगर्जीपणा आढळल्यास कारवाई केली जाईल, असे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

### विद्यार्थ्यांनो, शिवरायांचा देदिप्यमान इतिहास अनुभवायला सज्ज व्हा...!

## ठाण्यात 'शिवशंभू गाथा' कार्यक्रमाचे आयोजन





**■ठाणे। प्रतिनिधी,**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने एका भव्य ऐतिहासिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

'शिवशंभू गाथा' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून शिवरायांचा आणि शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराजांचा प्रेरणादायी इतिहास उलगडला जाणार आहे. ठाणे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

हा भव्य कार्यक्रम बुधवार, दि.१८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत 'राम गणेश गडकरी रंगायतन', ठाणे येथे पार पडणार आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे महाराष्ट्रातील नामवंत कलाकार आपल्या कलेतून इतिहास जिवंत करणार आहेत. यामध्ये 'कलर्स मराठी गौरव महाराष्ट्राचा' महाविजेता वैभव थोरात, 'सोनी टीव्ही मराठी इंडियन आयडॉल' विजेता सागर म्हात्रे आणि रोहित पाटील यांसारखे दिग्गज गायक आपली कला सादर करतील. तसेच सुप्रसिद्ध गायिका मैथिली भगत, पूजा म्हात्रे आणि कथावाचक कल्पेश डुकले यांच्या सादरीकरणातून विद्यार्थ्यांना स्वराज्याचा पराक्रम जवळून अनुभवता येईल.

ऐतिहासिक गाणी, पोवाडे, कथावाचन आणि नृत्याविष्काराने सजलेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाची आणि अभिमानाची मोठी पर्वणी ठरणार आहे. याशिवाय, १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथेही शिवजयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नवीन पिढीला आपल्या वैभवशाली संस्कृतीची आणि इतिहासाची ओळख व्हावी, या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमास जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून या सांस्कृतिक मेजवानीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रूपाली भालके आणि तहसिलदार सचिन चौधर, संदीप थोरात यांनी केले आहे.

### पॉलिटेक्निक कॉलेजच्या वसतीगृहासमोर रक्ताचा सडा

## विद्यार्थ्याची हत्या... चौघांवर धारदार शस्त्रांनी वार

**■लातूर। प्रतिनिधी,**

पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये शिकणाऱ्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्याची धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली आहे. या घटनेने संपूर्ण लातूर शहरात खळबळ उडालीये. किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. ही घटना कॉलेजच्या वसतीगृहासमोर घडल्याची माहिती आहे. या प्रकरणी पोलिसांनी चार जणांना अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

अधिकची माहिती अशी की, लातूर शहरातील नंदिस्टॉप परिसरात असलेल्या पुरणमल लाहोटी तंत्रनिकेतन महाविद्यालय येथे तृतीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये हा वाद झाला. मयत विद्यार्थ्याचे नाव विक्रम पांचाळ असे असून तो संबंधित महाविद्यालयात थर्ड इयरमध्ये शिकत होता. त्याच महाविद्यालयात श्रीधर पाटील नावाचा युवक दुसऱ्या शाखेत शिक्षण घेत होता. मिळालेल्या माहितीनुसार, काल सायंकाळी साडेचारच्या सुमारास कॉलेजच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर विक्रम पांचाळ आणि श्रीधर पाटील यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. सुरुवातीला हा वाद शाब्दिक पातळीवर होता; मात्र काही वेळातच तो वाढत गेला. वादानंतर दोघांनीही आपापल्या मित्रांना तसेच घरातील लोकांना घटनास्थळी बोलावून घेतले.

यानंतर कॉलेजच्या मुख्य गेटसमोर दोन्ही गटांमध्ये भांडण उफाळले. या दरम्यान श्रीधर पाटील आणि त्याच्या एका साथीदाराने विक्रम पांचाळ तसेच त्याच्या इतर तीन मित्रांवर धारदार शस्त्राने हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. या हल्ल्यात विक्रम पांचाळ गंभीर जखमी झाला. त्याला तत्काळ




उपचारासाठी हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेत आदित्य साडे (वय २०), सुजल रेडी (वय २०) आणि शंतनू परांडे (वय १७) हे तीन विद्यार्थी जखमी झाले असून त्यांना किरकोळ दुखापत झाल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तपासादरम्यान आरोपी श्रीधर पाटीलसह इतर तीन जणांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी पुढील तपास शिवाजीनगर पोलीस ठाणे करत आहेत. कॉलेजच्या परिसरात घडलेल्या या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. किरकोळ कारणावरून झालेला वाद इतका टोकाला जाऊन एका विद्यार्थ्याचा जीव गेला, यामुळे महाविद्यालयीन वर्तुळात हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांकडून घटनेचा अधिक तपास सुरू असून संबंधित आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.



### मुंबईत पुन्हा एकदा बेस्टने घेतला पेट, प्रवासी बचावले

**■मुंबई। प्रतिनिधी,**

बेस्ट उपक्रमाच्या कांदिवली स्टेशन ते अनिता नगर धावणारी २८९ क्रमांकाची डागा ग्रुपच्या भाडे तत्वावरील सीएनजी बसने पश्चिम द्रुतगती मार्गावर अचानकपणे पेट घेतला. त्यामुळे सदर परिसरात खळबळ उडाली. बस चालक, वाहक यांनी सतर्कता दाखवत बसमधील प्रवाशांना तातडीने बसमधून बाहेर काढल्याने सदर प्रवासी थोडक्यात बचावले. मात्र बेस्ट बस जळून खाक झाली. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. प्राप्त प्राथमिक माहितीनुसार, बेस्ट उपक्रमाची सीएनजी इंधनावर चालणारी 289 क्रमांकाची बस कांदिवली स्टेशन ते अनिता नगर या दरम्यान प्रवासी वाहतूक करते. दरम्यान, बसला लागलेली आग रात्री १०.०५ वाजता अग्निशमन दलाने विझविली. मंगळवारी (१७ फेब्रुवारी) रात्री ०९.१० वाजताच्या सुमाराला अनिता नगरच्या दिशेने पश्चिम द्रुतगती मार्गावरून धावत असताना साईधाम मंदिर येथे तांत्रिक बिघाडामुळे बसने पेट घेतला. त्यामुळे परिसरात खळबळ उडाली. सुदैवाने बसमधील सर्व प्रवाशांना बसमधून सुखरुप बाहेर काढण्यात आले. त्यानंतर बस संपूर्णपणे जळून खाक झाली. या घटनेमुळे रस्ते वाहतुकीवर काहीसा परिणाम झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस, बेस्टचे अधिकारी, अग्निशमन दलाचे जवान यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्न करून बसला लागलेली आग विझविली. त्यामुळे पुढील धोका टळला. सदर बसला आग का लागली, कशी काय लागली याबाबत स्थानिक पोलीस, बेस्ट आणि अग्निशमन दलाचे संबंधित अधिकारी अधिक तपास करीत असल्याचे समजते. मात्र बेस्ट उपक्रमाकडून कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

**गेल्या ८ महिन्यात ५ घटना**

- २० जानेवारी २०२६ मध्ये डबल डेकरला लागली होती आग, कांदिवली पूर्वेकडील समतानगर परिसरात पश्चिम द्रुतगती महामार्गावर एका चालत्या डबल डेकर बसला अचानक आग लागली होती.
- १५ ऑगस्ट २०२५ रोजी विक्रोळी स्थानकाकडून कन्नमवार नगरकडे जाणाऱ्या सीएनजी बसला (क्र. ३९७) दुपारी प्रगती विद्यालयाजवळ आग लागली. इलेक्ट्रिक यंत्रणेत शॉर्ट सर्किट झाल्यामुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला होता. सुदैवाने, चालक आणि वाहकाने प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढले होते.
- १५ जुलै २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडून मंत्रालयाकडे जाणाऱ्या एका डबल डेकर बसला आझाद मैदान परिसरात आग लागली. या घटनेमुळे परिसरात काही काळ वाहतूक कोंडी झाली होती.
- २४ जून २०२५ रोजी बोरिवली पूर्वेकडील देवीपाडा मेट्रो स्टेशनजवळ एका बसला आग लागली होती. या आगीचा धूर मेट्रो कोचमध्ये शिरल्याने प्रवाशांमध्ये घबराट पसरली होती.

## हॉटेल स्वस्तिकची तोडफोड करणाऱ्या युवकाला कोल्हापूरात पोलिसांनी दिला भर रस्त्यात चोप...

आज दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास अरबाज मोमीन हा स्वस्तिक हॉटेलमध्ये गेला. त्याने हॉटेल मालक मुनिर मलबारी यांना बेदम मारहाण केल्याचे सांगितले जाते. त्यानंतर त्याने हॉटेलमधील काऊंटर आणि टेबल उलथवून टाकत मोठ्या प्रमाणावर तोडफोड केली. हॉटेलमधील वस्तूंची नासधूस करण्यात आली. तसेच हॉटेलचा बोर्ड आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर दगडफेक करून ते फोडण्यात आले. एवढेच नव्हे तर हॉटेलच्या दारातील फरशादेखील फोडण्यात आल्या. सीसीटीव्ही कॅमेरे रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला फेकून दिल्याचेही प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. सुमारे अर्धा तास हा प्रकार सुरू होता. या काळात फोर्ड कॉर्नर ते उमा टॉकीज या मार्गावरून ये-जा करणारे प्रवासी आणि स्थानिक नागरिकांनी हा सारा प्रकार उघड्या डोळ्यांनी पाहिला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. रस्त्यावर मोठी गर्दी जमली आणि काही काळ वाहतूक कोंडीही झाली.

**■कोल्हापूर। प्रतिनिधी,**

कोल्हापूर शहरातील लक्ष्मीपुरी परिसरात वैयक्तिक वादातून एका तरुणाने हॉटेलमध्ये घुसून प्रचंड तोडफोड केल्याची घटना समोर आली आहे. रिलायन्स मॉलसमोरील लक्ष्मीपुरी फोर्ड कॉर्नर येथील 'स्वस्तिक' हॉटेलमध्ये हा प्रकार घडला. या प्रकरणी अरबाज मोमीन या तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून घटनेचा व्हिडीओही समोर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अरबाज मोमीन हा कोल्हापुरातील घिसाड गल्ली परिसरात कुटुंबियांसह वास्तव्यास आहे. त्याची आई लक्ष्मीपुरी फोर्ड कॉर्नर येथील स्वस्तिक हॉटेलमध्ये मजुरीचे काम करते. हॉटेलचे मालक मुनिर मलबारी आणि अरबाज मोमीन यांच्या आईमध्ये काही कारणावरून वाद झाला होता. या वादातून



निर्माण झालेल्या रागातून अरबाज मोमीन याने संतापाच्या भरात हॉटेलमध्ये धुडगूस घातल्याची माहिती आहे.

घटनेची माहिती लक्ष्मीपुरी पोलिस ठाण्यातील गोपनीय हवालदार एकनाथ कळंत्रे यांना मिळताच पोलिस पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. हवालदार वृंदा इनामदार, सुहास पाटील, मंगेश माने, सुरज पाटील, प्रतिक शिंदे आणि प्रियंका जामदार यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न केले. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचताच अरबाज मोमीन याला ताब्यात घेतले. दरम्यान, पोलिसांनी त्याला पकडल्यानंतर भर रस्त्यात चोप दिल्याचा व्हिडीओही समोर आला आहे. सध्या लक्ष्मीपुरी पोलिसांनी या प्रकरणी पुढील तपास सुरू केला आहे. वैयक्तिक वादातून घडलेल्या या घटनेमुळे व्यापारी आणि स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. परिसरातील सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांकडून अधिक खबरदारी घेतली जात आहे.

### अडीच वर्षांच्या लेकीसोबत वडिलांचे अश्लील चाळे

## आईने व्हिडिओ रेकॉर्ड केला... पुढे काय घडलं?

**■मुंबई। प्रतिनिधी,**

वडील आपल्याच मुलीवर लैंगिक अत्याचार करताना आईने रंगेहाथ पकडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. ज्या मुलीवर हैवानी कृत्य करण्यात आले ती मुलगी केवळ अडीच वर्षांची होती अशी माहिती समोर आली आहे. घटनेनं परिसर हादरून गेला आहे, दरम्यान ही घटना दिल्लीला लागून असलेल्या गाझियाबादमधील खोडा पोलीस ठाणे परिसरात घडल्याचे वृत्त आहे.

**आईने पुराव्यासाठी बनवला व्हिडिओ**

संबंधित व्हिडिओ बनवल्यानंतर धाडसी आई तिच्या मुलीला घेऊन पोलीस ठाण्यात गेली, नंतर पोलिसांना तिने संपूर्ण घटना सांगितली. पोलिसांनी कसलाही विलंब न करता आरोपीच्या मुसक्या आवळल्या, नंतर पीडितेला रुग्णालयात पाठवण्यात आले.

आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिका ी म्हणाले की, हा एक घृणास्पद गुन्हा आहे. आरोपीविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल.

**नवऱ्याने अडीच वर्षांच्या लेकीचं केलं लैंगिक शोषण**
मुलीच्या आईला काही काळापासून तिचा नवरा आलमवर संशय होता, तिला शंका होती की तो त्यांच्या निष्पाप मुलीसोबत चुकीचा प्रकार करत आहे. तिजच्या नव याचे हे हैवानी कृत्य उघडकीस आणण्यासाठी आई नव यावर सतत लक्ष ठेवून होती. अशातच वडील आलम मुलीवर अश्लील कृत्य करत असल्याचं पाहिलं आणि आईने शांतपणे व्हिडिओ रेकॉर्ड केला. हा व्हिडिओ नराधम बापाविरुद्ध एक पुरावा बनला.



## ठाणे जिल्ह्यातील सामूहिक अत्याचार प्रकरण

### पुण्यातून २२ वर्षीय आरोपीला अटक, वर्षभरापासून होता फरार

**■ठाणे। प्रतिनिधी,**

ठाणे जिल्ह्यातील सामूहिक अत्याचार आणि लूटप्रकरणातील वर्षभरापासून फरार असलेला २२ वर्षीय आरोपी अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे. पुणे जिल्ह्यातून त्याला अटक करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली.

नायगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय हजारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव नागेश केशव गायकवाड (२२) असे आहे. नोव्हेंबर २०२४ मध्ये नोकरीच्या आमिषाने एका महिलेला खोलीत डांबून तिच्यावर सामूहिक अत्याचार करण्यात आल्याच्या प्रकरणात तो सहभागी होता. गुन्हा दाखल झाल्यापासून तो खरी ओळख लपवून अटक टाळत होता. मिळालेल्या गुप्त माहितीनुसार आणि तांत्रिक तपासाच्या मदतीने पोलिसांनी त्याचा माग काढला. तो कामशेत परिसरात असल्याचे समजताच रविवारी त्याला ताब्यात घेण्यात आले.

**गायकवाडकडून गुन्ह्याची कबुली, सर्व चार आरोपी अटकेत**

नागेश गायकवाडवर पीडितेचा विनयभंग केल्याचा आणि लुटीत सहभागी असल्याचा आरोप आहे. या प्रकरणात सब्बत, चव्हाण आणि पुजारी यांना यापूर्वीच अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी आरोपींवर भारतीय न्याय संहिता कलम ६४(२)(म) (बलात्कार), ३०९(१) (दरोडा), ७० (सामूहिक बलात्कार), ७५(१)(४) (लैंगिक छळ) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. प्राथमिक चौकशीत गायकवाडने गुन्ह्यातील सहभाग कबूल केल्याचे पोलिसांनी सांगितले असून पुढील तपास सुरू आहे.

**नोकरीच्या आमिषाने सामूहिक अत्याचार**
२७ नोव्हेंबर २०२४ रोजी पीडित महिला नोकरीच्या शोधात पुण्यात गेली होती. मुलाखत हुकल्यामुळे तिने तिच्या पतीचा मित्र पवन राजेंद्र प्रसाद सब्बत (२९) याच्याशी संपर्क साधला. त्याने नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन देत तिला ठाण्यातील मीरा रोड येथे बोलावले. तिथे सब्बतने तिला एका खोलीत डांबून ठेवले. तपासात समोर आले की सब्बत आणि त्याचे साथीदार धनराज चव्हाण (२१) व अभिषेक पुजारी (२२) यांनी त्याठिकाणी अनेक दिवस तिच्यावर अत्याचार केला. तसेच तिचा मोबाईल, सोन्याचे दागिने आणि रोकड असा एकूण सुमारे ७५ हजार रुपयांचा माल लुटल्याचा आरोप आहे. सब्बतने पीडितेच्या नावाचा वापर करून बनावट इंस्टाग्राम प्रोफाइल तयार करून तिचे फोटो अपलोड करून छळ केल्याचेही तपासात उघड झाले आहे.

# संपादकीय



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## कृत्रिम बुद्धिमत्ता सर्वांसाठी




सन २०२५-२६ पासून भारताने कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे एआय या क्षेत्रात आपले स्थान मजबूत केले. केंद्रीय चौकट जी २०२५ मध्येच निश्चित करण्यात आली होती. तिला आता व्यापक स्वरूप देण्यात आले. दिल्लीच्या भारत मंडपम येथे परिषद भरत आहे. एआय तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ तंत्रज्ञान म्हणून न करता तिचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी आणि विकास करण्याचा उद्देश आहे. सुरुवातीला या एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी १०,३७१.९२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. या द्वारे एआय संपूर्ण भारतासाठी कसे उपयुक्त ठरेल आणि मूलभूत मॉडेल्स आणि डेटा बेसेसाठी एआय तंत्रज्ञान कसे उपयुक्त ठरेल हे या परिषदेतून सांगितले जाईल. विषय सर्वसामान्यांना थोडा कळण्यास अवघड आहे. पण यासाठीच परिषद आहे. एआयचा उपयोग करून सामान्यांचे जीवन कसे सुसह्य करता येईल. लोकसमूह, ग्रह आणि प्रगती ही ती सूत्रे आहेत. ज्यांच्या भोवती परिषदेत काम केले जाईल आणि ही सूत्रे समावेशकता, शाश्वत आणि मानवी केंद्रीत एआय या भोवती रचना तयार करण्यात आली. लोकसमूह याचा अर्थ मानव केंद्रित एआय असून मानवतावादाची सेवा मानवांचे हक्क आणि सार्वजनिक सेवांप्रती सर्व लोकांना अधिकार तसेच विश्वासाची बांधणी करून देता येतो यावर हे सूत्र आधारलेले आहे. एआय समावेशक आणि मानवी प्रतिष्ठा यांना आणि भारतातील सांस्कृतिक वैविध्याचा आदर राखून जपवणूक करेल असे दुसरे सूत्र आहे. आपला ग्रह पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत एआय पद्धतींना अनुकूल राहील असाही उद्देश आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ऊर्जा सक्षम तंत्रज्ञान आणि जबाबदारीने वापर करून हवामान कृतींना पाठिंबा देईल अशी लवचिकता प्रदान करेल असे तंत्रज्ञान उभारणे असा आहे. भारत भरणाऱ्या परिषदेची व्याप्ती इतकी मोठी आहे, की भारत मंडपम येथे भरणाऱ्या परिषदेत २.५ लाख प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. यात परदेशातून फ्रान्सचे ईमॅन्युएल मॅक्रॉन, ब्राझिलचे लुला डासिल्हा, स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सँचेझ आदींसह उपस्थित रहाणार आहेत आणि परदेशातून तज्ज्ञ या परिषदेसाठी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यात सुंदर पिचाई, सेमी कंडक्टर आणि फाईव्ह जी तंत्रज्ञान राबवण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेले क्रिस्टियानो एमोन आर्दीचा समावेश आहे. नवी दिल्लीत सुरू होणारी परिषद ही भारतासाठी अशा प्रकारची पहिलीच परिषद आहे आणि एआय धोक्यांचे कसे व्यवस्थापन करायचे हे शिकवणारी आहे. तसेच नावीन्यपूर्ण संशोधनास रुळावर व्यवस्थित कसे ठेवायचे याचाही विचार केला जाणार आहे. याची जी चौकट आखली आहे ती एआयचा वापर करताना पक्षपात आणि गैरवापराला आळा घालणे आणि तसे करतानाही भारताचे हेतू जबाबदार एआय व्यवस्थापन करणे यापुरते मर्यादित आहे. या परिषदेतून भारताचा हेतू हा स्पष्ट होतो, की जबाबदार एआय गव्हर्नन्सला आकार देण्याचा आ-हे. पण यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा आहे, की एआयच्या मार्गदर्शक तत्त्वे जी आहेत ती आरोग्य, शिक्षण, कृषी आणि वित्त यात कशी उपयोगात आणली जातील यावर विचार करण्याचा आहे. कठोर नियंत्रणाशिवाय चौकटीने सात व्यापक सूत्रे निश्चित केली आणि जी धोरणकर्ते आणि उद्योग या दोघांनाही मार्गदर्शन करतील. यामध्ये विश्वास हा पाया, पीपल फर्स्ट म्हणजे लोक सर्वोपरी, संशोधनापेक्षा संयम महत्त्वाचा आणि समानता आणि जबाबदारी यांचा समावेश आहे. या सूत्रांचा यावर भर आहे, की एआय सिस्टीमनी मानवी निर्णय प्रक्रियेला पाठिंबा दिला पाहिजे आणि तरीही ते पारदर्शक आणि कोणतेही पक्षपात टाळून साध्य करता आले पाहिजे. या परिषदेचे सर्वात प्रमुख वैशिष्ट्य हे आहे, की सध्याच्या कायद्यावरील अवलंबितता. अधिकाऱ्यांनी सांगितले आहे, की अनेक एआयशी संबंधित धोके हे सध्याच्या कायदेशीर चौकटीत समाविष्ट आहेत आणि त्यात आयटी नियमावली आणि गुन्हेगारी कायदे यांचा समावेश आहे. या मार्गदर्शक तत्त्वांत असे सांगितले आहे, की एआय डेव्हलपर्स आणि डिप्लॉयर्सकडून काय अपेक्षा आहे. संशोधनाला प्राधान्य देऊन सरकारने केवळ ते एआयचा प्रमुख वापर करणारे नाही तर जबाबदार आणि समावेशक कारभार जो भारताचा २०४७ साली साकार होणारा विकसित भारत दृष्टिकोन साध्य करणारा असेल असे सिद्ध करू पहात आहे. एआयचा उपयोग विविध कारणांसाठी होतो आणि हेच या परिषदेचे सार आहे. रोजगार, भाषा, नवीन रोजगार मिळवणे, सार्वजनिक सेवा आणि सामान्य लोकांना लाभप्रद होतील अशा योजना राबवणे यासाठी एआयचा उपयोग कसा करता येईल या दृष्टीने या परिषदेत विचार केला जात आहे. ब्रिटनचे उपपंतप्रधान डेव्हीड लॅमी आणि एआय मंत्री कनिष्क नारायण हे भारतात आलेल्या शिष्ट मंडळात आहेत. त्यांनी सांगितले, की एआयचा उपयोग करून रोजच्या जीवनात कसा सामान्यांना लाभ करून देता येईल आणि जगाच्या प्रत्येक कोपऱ्यात एआयचा उपयोग करून डॉक्टर त्वरीत रोगनिदान करतील, शिक्षक शिकवण्यात नववीन पद्धती आणतील आणि परिषदा सेवा झटपट देऊन उद्योग नवीन जनरेशनचे रोजगार तयार करतील हे पहाण्यासाठी एआयचा वापर केला जाईल. एआय हे अभूतपूर्व वचन देते की जागतिक आव्हानांना जसे की सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षण आणि शेतीत उत्पादकता वाढवणे आणि त्यासोबतच मानवी हक्कांचा आदर करणे याबाबत क्रांतिकारी आहे. एआय पद्धतींचा वापर जर उपयोगकर्ते आणि विकासक यांच्यामार्फत झाला तर समाजाला त्याचा शेवटी प्रचंड लाभ होऊ शकतो. जगात सर्वात जास्त लोकसंख्या असूनही भारतात सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे आणि डिजिटल बाजारपेठांपैकी ती सर्वात वेगाने वाढणारी आहे. मानवता, समावेशक वाढ आणि शाश्वत विकासासाठी एआयचा उपयोग केला पाहिजे असे जे भारताचे इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले ते अगदीच योग्य आहे. ही शिखर परिषद राष्ट्रीय क्षमता, आर्थिक लवचिकता आणि दीर्घकालीन क्षमतांची सक्षम देश म्हणून भारताची ओळख निश्चित करेल. अत्यंत झपाट्याने बदलत असलेल्या एआयचे जग समजण्यासाठी आणि एआयचा उद्देश्य सामान्य जनांपर्यंत पोहोचवणे हा या परिषदेचा हेतू आहे. भारत भरवत असलेल्या या परिषदेची संकल्पना आहे. सर्वजन हिताय सर्वजन सुखाय. हा हेतू सर्व काही सांगून जाणारा आहे. यावेळी परिषदेचा हेतू एआयपासून धोका हा केवळ नाही तर एआयपासून सामान्य लोकांना होणारा फायदा हाही आहे.

## शहरी भागांना अमली विळखा




नवी मुंबई, ठाणे, नालासोपारा आदी भागात अमली पदार्थ तस्करी, अमली पदार्थ बाळगणे, विकण्याचे प्रकार अलीकडे वारंवार होऊ लागले आहेत. पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी शाखेसमोर हे आव्हान निर्माण झाले आहे. यातून तरुणांच्या भवितव्याला धोका निर्माण होऊ पाहत आहे. आधुनिक जीवनपद्धतीत 'खा, प्या, मजा करा' ही उपभोगी वृत्ती वाढीस लागत असून यातून तरुण-तरुणीही अमली पदार्थांकडे आकर्षित होत आहेत. अमली पदार्थांचे व्यसन हे प्रामुख्याने उच्चभ्रू वतुर्ळात आढळते, एमडी अर्थात मेफोड्रेन तसेच इतर अमली पदार्थांच्या खरेदी-विक्रीच्या वतुर्ळात केवळ सधनांना प्रवेश असतो, मात्र अलीकडच्या काळात काही सामान्य किंवा उच्च मध्यमवर्गीय गटातील तरुण-तरुणीही या व्यसनाच्या आहारी जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. पार्टी कल्चर आणि व्यक्तीगत 'स्पेस'चा मन मानेल तसा चुकीचा अर्थ काढला जात आहे. 'माझ्या आयुष्याचे मी काहीही करेन, इतरांचा संबंध नाही' या आत्मकेंद्री वर्तनाला बंड किंवा विद्रोहाचे नाव देऊन अनैतिक जगण्याचे समर्थन केले जात आहे. या मागील सामाजिक वास्तव समजून घेणे गरजेचे आहे. आधुनिक जगात आनंदाच्या व्याख्या बदलल्या आहेत. पैसा, प्रतिष्ठेच्या संकल्पना भांडवलवादी बाजारांनी ठरवल्याच नाहीत तर त्या माणसांच्या मनात ठसवल्या आहेत. त्यामुळे कुटुंब, नैतिक जबाबदारी, समाजभान आदी मूल्य संकुचित होत असताना अमली पदार्थांच्या व्यसनात तरुणाई अडकत आहे. आत्मियता, जिव्हाळा, प्रेम, कुटुंबवत्सलता या शब्दांचे गांभीर्य व्यवहारी जगात कमी होत असल्याने अमली पदार्थ व्यसनाला पोषक वातावरण जाणीवपूर्वक तयार केले जात आहे.

पोलिसांनी नुकत्याच केलेल्या कारवायांमधून हा विषयाचे गांभीर्य लक्षात यावा. अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सच्या अधिकाऱ्यांनी वाशी ते जुईनगर परिसरातून एका नायजेरियन दुचाकीस्वाराला ताब्यात घेतले. त्याच्या दुचाकीत १७ लाखांची ७० ग्रॅम एमडी पावडर आणि १२० एमडीएमए या अमली पदार्थाच्या गोळ्या जप्त केल्या. त्याच्या घरातून १४ ग्रॅम एमडी पावडर आणि २३ ग्रॅम वजनाच्या जांभळ्या रंगाच्या एकुण ४० एमडीएमए गोळ्या हस्तगत करण्यात आल्या. अमली पदार्थांच्या खरेदी-विक्रीशी संबंधित असलेल्यांना ठाणे, नवी मुंबई, विरार वसई भागात राहायला घरे मिळतातच कशी? यावरून स्थानिकांनाही याविषयीचे गांभीर्य पुरेसे नसल्याचे स्पष्ट व्हावे. कल्याण पोलिसांनी नुकत्याच केलेल्या कारवाईत ड्रग्ज तस्करीचे मोठे जाळे नष्ट केले तसेच तिघांना जेरबंद केले. आरोपींकडून दोन कोटींहून अधिक किमतीचे ह्यएमडीह्ण ड्रग्ज जप्त करण्यात आले तसेच कोकेनचा दोन कोटी किमतीचा साठाही हस्तगत केला. डोंबिवलीसारख्या मराठीबहुल भागातील पोलिसांच्या या कारवाईतही परदेशी नागरिकांचा सहभाग आढळला असून नायजेरीन, बांगलादेशी महाराष्ट्रातील प्रमुख शहरात केवळ राहात नसून ते या ठिकाणी त्यांचा विषारी व्यवसाय वाढवत असल्याचेही स्पष्ट होते. थोड्याफार रकमेसाठी स्थानिकांकडूनच अशांना राहाण्यासाठी जागा उपलब्ध केल्या जात आहेत. भाडेतत्वावर राहार्णायांची नोंद स्थानिक पोलीस ठाण्यात करणे बंधनकारक असताना हा नियम सहज दुर्लक्षित केला जात आहे.

भिवंडी तालुक्यात ठाणे ग्रामीण पोलिसांनी केलेल्या कारवाईत एका व्यक्तीकडून ५८ ग्रॅम वजनाचे ११ लाखांचे एमडी ड्रग्ज जप्त केले. अगदी एका छोट्या पिशवीतही कोट्यवधींचे अमली पदार्थ लपवता येत असल्याने त्याची तस्करी शोधणे कठीण असते. सध्याच्या काळात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या बॅगेत सिगारेट ही सामान्य गोष्ट म्हणून पाहिली जात आहे. पुढे हेच व्यसन गांजा, एमडी, कोकेनच्या दिशेने जात असल्याने या चिंतेकडे दुर्लक्ष करता कामा नये, असा इशारा नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो मुंबईचे माजी झोनल संचालक समीर वानखेडे यांनी दिला आहे. हर्बल हुक्का, गांजा, चरस, ड्रग्स, कोकेन, कफ सिरपच्या बेकायदा विक्रीवर अधून मधून कारवाई होत आहे. येत्या काळात हा धोका वाढत असून सुरक्षा यंत्रणा, शैक्षणिक संस्था, सांस्कृतिक संस्था, तरुण मित्र मंडळे आणि समाजातील सर्वच संस्था संघटनांनी अमली पदार्थांचे धोके समोर आणण्यासाठी याकामी पुढाकार घ्यायला हवा. कौटुंबिक पातळीवर मित्र, मैत्रिणी, मुलांशी पालक-शिक्षकांचा संवाद होणे गरजेचे आहे. भारतात मेट्रोसिटीतील उच्चभ्रू कुटुंबातील तरुणाई आर्थिक सुबत्तेमुळे अमली पदार्थ सहज मिळवतात. सिगारेट, हुक्का पार्लरही सहज गोष्ट मानली जात आहे. काही महिन्यांपूर्वी तब्बल ५७,९३७.७६ किलो अंमली पदार्थ म्हणजेच सुमारे २ ते अडीच कोटी रुपयांचे अमली पदार्थ ठाणे पोलिसांकडून जप्त करण्यात आले. कल्याणमध्ये खडकपाडा पोलिसांनी १७ ड्रग्ज तस्करांवर मोक्काची कारवाई केली. यात १५ किलो गांजासह १३ आरोपींना अटक झाली तर चार आरोपींचा शोध घेतला जात आहे. विशाखापट्टणम ते कल्याण असे अमली पदार्थांचे रॅकेट फोफावले असल्याचे यातून समोर आले. यात तपासाची पाळेमुळे ठाण्यातून परराज्यासह थेट नायजेरिया तसेच परदेशापर्यंतही पसरली आहेत. मुंबई, ठाणे, पुणे आदी महानगरे अमली पदार्थांसाठी मोठी हक्काची बाजारपेठ बनू पाहत आहेत, हे आव्हान वेळीच ओळखता यायला हवे. कारण पैसा आला की, अमली पदार्थ घेणाऱ्यांची संख्या वाढते. पंजाबमध्ये तेच झाले त्यामुळे त्याचा उडता पंजाब झाला, आपल्याकडे असे होऊ नये अशी अपेक्षा.

## पैशासाठी विकला गेला!

'अमेरिकेने पाकचा वापर 'टॉयलेट पेपर'सारखा करून त्याला फेकून दिले', हे विधान भारतातील एखाद्या हिंदुत्वनिष्ठ नेत्याने किंवा मंत्र्याने केलेले नाही, तर पाकचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनीच पाकच्या संसदेत केले. स्वतःच्या देशाच्या स्थितीला हुबेहूब ओळखू शकणारे आणि ते संसदेत मांडणारे आसिफ पहिलेच मंत्री नाहीत, तर स्वतः पाकचे पंतप्रधान राहिलेले इम्रान खान यांनीही हेच सत्य वेगळ्या शब्दांत मांडले होते. '१९८० च्या दशकात अफगाणिस्तानमधील अमेरिका आणि रशिया यांच्यातील शीतयुद्धासाठी पाकचा वापर करून आतंकवाद्यांची निर्मिती करण्यात आली आणि शीतयुद्ध थांबल्यानंतर हेच आतंकवादी पाकच्या विरोधात कारवाया करू लागले', असे इम्रान खान यांनी म्हटले होते. मुळात हे लक्षात येऊन आणि उघडपणे सांगून पाकच्या सर्वपक्षीय नेत्यांना अन् भिकारी जनतेला त्याची काहीच लाज वाटत नाही किंवा ते याविरोधात आंदोलन करत आहेत, असेही कुठे दिसत नाही. इतके झाल्यानंतर आजही पाकिस्तान 'टॉयलेट पेपर'सारखाच स्वतःचा वापरू करू देत आहे, हे आणखी लज्जास्पद आहे. पूर्वी अमेरिकेसाठी, नंतरच्या काळात चीनसाठी आणि आता पुन्हा अमेरिकेसाठी पाक 'टॉयलेट पेपर' झाला आहे. जगाच्या पाठीवर पाकिस्तानसारखा देश नाही आणि ते स्वतःहून सांगणाराही कुणी नाही. पाकची निर्मिती करणारे महंमद अली जिना यांनाही कधी पाकची ही स्थिती होईल, असे वाटले नसेल. तरीही पाकच्या स्थापनेच्या काही महिन्यांतच ते आजारी पडले होते आणि त्यांच्या तेव्हाच लक्षात आले की, पाकची निर्मिती करून त्यांनी चूक केली आहे. ही चूक किती भयानक आहे, हे गेली ७८ वर्षे भारत पहात आहे आणि त्याची किंमतही मोजत आहे.

पाकिस्तान आणि अमेरिका यांचे नाते कधीही समान स्तरावरचे नव्हते. शीतयुद्धाच्या काळात सोव्हिएत युनियनला रोखण्यासाठी अमेरिकेला दक्षिण आशियात एक 'तळ' हवा होता आणि पाकिस्तानने ती जागा आनंदाने दिली. १९८० च्या दशकात अफगाणिस्तानमध्ये सोव्हिएत रशियाविरुद्ध 'मुजाहिद्दीन' उभे करण्यासाठी अमेरिकेने पाकिस्तानचा वापर 'प्रॉक्सी' म्हणून केला. तेव्हा पाकिस्तानला डॉलर्सची रसद मिळत होती; म्हणून हे 'वापरले जाणे' त्यांना भूषणावह वाटत होते. पाकिस्तानची सर्वात मोठी चूक म्हणजे त्यांनी स्वतःची अर्थव्यवस्था भक्कम करण्याऐवजी स्वतःचे भौगोलिक क्षेत्र विकायला काढले. 'आम्ही तुमच्यासाठी लढतो, तुम्ही आम्हाला पैसे द्या,' ही मानसिकता पाकिस्तानच्या सैन्याने जोपासली. जेव्हा गरज संपली, तेव्हा अमेरिकेने हात झटकले. आज जेव्हा अमेरिकेची प्राथमिकता भारताकडे झुकली आहे, तेव्हा पाकिस्तानला आपण 'उपेक्षित' असल्याचे जाणवू लागले आहे. अमेरिकेला केलेल्या साहाय्यापोटी पाकला अब्जावधी डॉलर्सचे सैनिकी साहाय्य मिळाले हे खरे असले, तरी त्या बदल्यात पाकिस्तानने स्वतःच्या भूमीवर आतंकवादाचे पीक पेरले. आज तोच आतंकवाद 'तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान'(टीटीपी)च्या रूपाने त्याच्याच गळ्याला नख लावत आहे. सामाजिक वीण विस्कटली असून अर्थव्यवस्था दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आहे.

'अमेरिकेने पाकिस्तानचा वापर केला', असा आरोप करतांना आसिफ हे विसरतात की, पाकिस्ताननेही अमेरिकेसमवेत 'डबल गेम' खेळला. ओसामा बिन लादेन पाकिस्तानच्या सैनिकी छावणीच्या शेजारी सापडणे, हे याचे सर्वात मोठे उदाहरण होते. अफगाणिस्तानमध्ये तालिबानला छुप्या मार्गाने साहाय्य करून पाकिस्तानने अमेरिकेचा विश्वास गमावला. आज अफगाणिस्तानमध्ये तालिबानची सत्ता असूनही पाकिस्तानचे त्यांच्याशी संबंध ताणलेले आहेत, हे त्यांचे सर्वात मोठे धोरणात्मक अपयश आहे.

पाकिस्तान जेव्हा जेव्हा अमेरिकेच्या जवळ गेला, तेव्हा तेव्हा भारतासाठी सुरक्षेची आव्हाने उभी राहिली; मात्र गेल्या दशकात भारताने स्वतःचे सामरिक महत्त्व इतके वाढवले आहे की, अमेरिकेला आता पाकिस्तानची आवश्यकता उरलेली नाही. अमेरिकेला आता आशिया-पॅसिफिक क्षेत्रात चीनला रोखण्यासाठी भारतासारख्या मोठ्या लोकशाहीची आणि भक्कम अर्थव्यवस्थेची आवश्यकता आहे. भारताने अमेरिकेशी मैत्री करतांना कधीही स्वतःचे राष्ट्रीय हित गहाण ठेवले नाही. रशियाकडून तेल विकत घेतांना किंवा 'एस्-४००' संरक्षणप्रणाली घेतांना भारताने अमेरिकेला ठणकावून सांगितले की, 'आमचे निर्णय आम्हीच घेऊ.' पाकिस्तानला मात्र हे कधीच जमले नाही. जेव्हा अमेरिकेचे अध्यक्ष पाकिस्तानच्या पंतप्रधानांना दूरभाष करणेही टाळतात आणि भारताच्या पंतप्रधानांचे वाजतगाजत स्वागत करतात, तेव्हा पाकिस्तानचा हा संताप 'टॉयलेट पेपर'सारख्या विधानांतून बाहेर येतो. पाकिस्तानची ही चिडचिड भारताच्या वाढत्या प्रभावामुळेही आहे. भारताने रशिया आणि अमेरिका या दोन्ही देशांशी स्वतंत्रपणे अन् सन्मानाने संबंध प्रस्थापित केले, जे पाकिस्तानला कधीच जमले नाही. सध्या पाकिस्तान चीनच्या गोटात शिरला आहे; पण तिथेही 'सीपेक'च्या (चीन-पाकिस्तान आर्थिक महामार्गाच्या) नावाखाली पाकिस्तान कर्जाच्या खाईत ढकलला जात आहे. सीपेक एक प्रकारचे 'कर्ज-जाळे' आहे. पाकिस्तानची अवस्था आता 'आगीतून फुफाट्यात' अशी झाली आहे. ख्वाजा आसिफ यांची टीका ही कदाचित चीनला खूश करण्यासाठी आणि अमेरिकेवर दबाव निर्माण करण्यासाठी असू शकते; पण त्याचा परिणाम मात्र उलट होण्याची शक्यता आहे. ख्वाजा आसिफ यांनी अमेरिकेवर टीका केली असली, तरी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून कर्ज मिळवण्यासाठी त्यांना आजही अमेरिकेच्याच दारात उभे रहावे लागते.

जो देश स्वतःच्या स्वाभिमानाचा सौदा करतो, त्याला शेवटी 'वापरला' गेल्याची भावनाच मिळते. शेवटी आंतरराष्ट्रीय राजकारणात 'कुणीही कायमचा मित्र किंवा शत्रू नसतो, केवळ हितसंबंध कायम असतात,' हे कटू सत्य पाकिस्तानला आता समजले असावे. पाकिस्तानने अमेरिकेवर आरोप करण्यापेक्षा स्वतःच्या 'आतंकवाद समर्थक' धोरणांचे आत्मपरीक्षण करण्याची आवश्यकता आहे. जोपर्यंत पाकिस्तान स्वतःची 'भाडोत्री राष्ट्र' ही ओळख पुसत नाही, तोपर्यंत त्यांना आंतरराष्ट्रीय राजकारणात असाच अनुभव येत राहील. कुत्र्याची शेपूट कितीही वेळ नळीत घालून ठेवली, तरी ती सरळ होत नाही, तसेच पाकचे आहे. पाकचे अस्तित्व आता काही वर्षांचेच राहिलेले आहे. त्यापूर्वी त्याने स्वतःहून पोसलेला आतंकवाद स्वतःहून नष्ट करावा.

## एकाचा निष्काळजीपणा दुसऱ्याचा घेते जीव!



उत्तर प्रदेशातील जौनपूर जिल्ह्यातील रामथनी गावचे सरपंच रामथनी यादव आपल्या भाचीच्या लग्नासाठी मुंबईत आले होते. मुंबईत मुलुंडमध्ये मेट्रो पुलाचा अवजड कठडा कोसळून त्या सरपंचांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेची जबाबदारी प्रशासन, सरकारवर आणि कामाशी संबंधित कंत्राटदाराची असते. दुर्घटनेला अपघात म्हणून घेणे म्हणूनच स्वच्छ फसवणूक असते. अपघात कधीही घडत नाही, जो घडतो तो परिणामच असतो, एकाची निष्काळजी दुसऱ्याचा जीव घेते.

दुर्घटनेत मृत्यू झालेले सरपंच रामथनी यादव यांच्या कुटुंबियांनी त्यांच्या मृत्यूला प्रशासन आणि सरकारी यंत्रणेला जबाबदार धरून मृतदेह ताब्यात न घेण्याचा पवित्रा घेतला आहे. मृत सरपंचाच्या कुटुंबियांनी योग्य ती नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. त्याशिवाय सरपंचांचा मृतदेह ताब्यात घेणार नाही, असे जौनपूरमधील ग्रामस्थांनी स्पष्ट केले. आपल्याकडे अशा अचानक होणाऱ्या मृत्यूंना बातम्यांमध्ये 'काळाची झडप' 'यमाने गाठले' 'अचानक डोंगर कोसळला' आदी वाक्प्रचारातून व्यक्त केले जाते. मुंबई किंवा ठाणे, पुण्यासारख्या शहरात कित्येक ठिकाणी काळाची झडप घालण्यासाठी ठिकठिकाणी यमराज दबा धरून बसलेले आहेत.

काही वर्षांपूर्वी भारतातील मेट्रोपोलिटन शहरात अदृश्य स्वरुपाचे पोकॅमॉन शोधण्यासाठी स्मार्टफोनच्या लोकेशनवरून तरुणाई रस्त्यावर गल्लोगल्ली हिंडत होती, इंटरनेटवरील 'पोकेमॉन गो' नावाचा हा खेळ होता, जास्तीत जास्त पोकेमॉन शोधल्यास तेवढ्या प्रमाणात गुण खेळर्णायांना मिळत होते. अमेरिकेतील हे फॅड इथेही आले होते. अमेरिकेत असे अदृश्य पोकेमॉन शोधताना २९ हजार तरुण यात जखमी झाले होते तर २५० हून अधिक तरुण या जीवघेण्या खेळात मृत्यूमुखी पडले होते. त्यामुळे या खेळावर कायमस्वरूपी बंदी आली होती.

आज मुंबई-पुण्यासारख्या शहरात ठिकठिकाणी असेच मरणाचे कित्येक अदृश्य पोकेमॉन ठिकठिकाणी दबा धरून बसलेले आहेत. कोण कुठे कधी कसे गाठेल,याची कोणतीही शाश्वती नाही. जन्म आणि मृत्यू सांगून येत नाही, हे खरेच. निसर्गातील ही दोन्ही स्थित्यंतरे माणसांच्या हातात नाहीत, हेही खरेच, परंतु जन्माची सिद्धता माणसांकडूनच होत असते, त्यामुळे जन्म झाला की मृत्यू ठरल्याचे जगातील सर्वच धार्मिक तत्वज्ञांनी मान्य केलेले सूर्यसत्य मानावे. मरणाला कोणाचाही नकार नाही आणि नसतो, मुळात तो प्रश्न नाही, तर मृत्यू कसा येतो, हा प्रश्न आहे. वेदना देणारा, अचानक झडप घालणारा मृत्यू नसतोच तो काळच असावा. या काळाला पोषक वातावरण आणि आमंत्रण देणारे घटक वाढवण्यात माणूस नावाच्या प्राण्याला मोठा रस असतो, माणूस त्याला विकास, प्रगती, योजना, प्रकल्पांची गोंडस नावे देतो. लोकल प्रवासादरम्यान असे कित्येक मृत्यूचे पोकेमॉन दबा धरून बसलेले असतात, त्यांच्या तावडीत सापडलेल्यांना ते सोबत निर्दयीपणे पुढच्या प्रवासाला घेऊनच जातात. सोबत घेऊन जाताना त्याने मागे काय सोडले आहे? याची चिंता व्यवस्था, प्रशासन किंवा सरकार, समाज, समुदायाला नसते. कुटुंबातून नेणाऱ्याला ओरबाडून नेले जाते, मात्र या ओरबाडण्यातून ज्या भेसूर जखमा कुटुंबियांच्या मागे सोडल्या जातात, त्या पुढे कायमच्या वेदना देणाऱ्या, चिघळणाऱ्या असतात. एखाद्या घरातला कर्ता पुरुष, आई, बहीण, लग्न ठरलेली नियोजित वधू किंवा वर कोणीही या दबा धरून बसलेल्या मृत्यूच्या नजरेतून सुटत नाही, इथं कोणाला कसलीही माफी नाही. मृत्यूने कायम समता जपलेली असते त्याच्याकडे श्रीमंत-गरीब किंवा जातधमार्चा कुठलाही भेद नसतो. मृत्यूला एकच डोळा असतो. त्या डोळ्यामागे कुठलाही मेंदूच नसल्याने फरक करणारा विचार त्याचा कधीही नसतो.

दुर्घटनेला अपघात म्हणवून घेणे म्हणूनच स्वच्छ फसवणूक असते. अपघात कधीही घडत नाही, जो घडतो तो परिणामच असतो, एकाची निष्काळजी दुसऱ्याचा जीव घेते, निष्काळजी करणाऱ्यांनाही बरेचदा त्यांच्या निष्काळजीचा असा भीषण परिणाम होईल याचा अंदाज नसतो. मुलुंड मेट्रो पुलाच्या कामात पुलाच्या कठड्यातील लोखंडी सळ्यांचे वेल्डींग करणाऱ्याने कामात ढिसाळपणा केल्याने कठडा कोसळल्याची प्राथमिक माहिती हाती आली आहे. यातील वेल्डींग कामगार फरार झाला आहे. त्याचा उद्देश नक्कीच कोणाला मारण्याचा नसावा, म्हणून हा अपघात समजून त्यातून अंग काढून घेण्याचा नाकर्तेपणा सरकारी आणि प्रशासकीय पातळीवरून दुर्घटनेनंतर केला जाऊ शकतो. आपल्याकडे जन्माच्या तुलनेत मरण कमालीचं स्वस्तं असतं. 'अकस्मात मृत्यू' असा शब्दप्रयोग केल्यावर आपण जबाबदारीतून मुक्त होतो. आपल्याकडे रस्त्यावरचे खड्डे हा केवळ पालिकेच्या नाकर्तेपणाचा आणि रस्ते कामातील भ्रष्टाचाराचा विषय असतो. रस्त्यावरच्या एकाच खड्डयाने कित्येकांना गिळलेले असते, त्यात दुचाकीस्वार सर्वाधिक असतात, कधी कधी त्याचे दुर्दैवी कुटुंब असते, चिल्लीपिल्लीही असतातच. 'अरेरे, च्चच्चच्च' करून हळहळ व्यक्त करून आपण झालेल्या घटना विसरून जातो. जे बचावलेले असतात ते सुपात असल्याने जात्यातल्यांच्या वेदना त्यांना कळत नाहीत, 'ते गेले आम्ही बचावलो' असे बोलून आपण सुटका करून घेतो.

महानगरातल्या शहरीकरणात झाकणं नसलेली किंवा कमकुवत तुटलेल्या झाकणांची मेनहोल्स, खड्डे, इमारतीच्या लिफ्टचे डक्ट, विकासकामांची ठिकाणे, मनोऱ्यांवरच्या उच्च दाबाच्या वीज तारा, असंतुलित रस्त्यांवरचे कोपरे, उखडलेले पेव्हरब्लॉक्स, सांडपाणी साचणारी डबकी, गटारं, नाले, संक्रांतीच्या पतंगाचे धारेदारे नायलॉन मांजे, खुले वीज डीपी, रस्त्यावर धावणारे डंपर्स, ट्रक, ट्रेलर्स, मिक्सर, कोसळण्याच्या बेतात असलेली झाडे, फांद्या, रस्त्यावरच्या खाणावळींचे गॅस सिलिंडर्स, स्टोव्ह, शेगड्या, जीर्ण वीजतारा, रस्त्यावर पडलेले आठ दहा थेंब इंजिन ऑईल, सिमेंट रस्त्यावर अचानक पडलेला खोल खड्डा, इमारतीची लिफ्ट उचलणारी, सोडणारी साखळी, कललेले वीज खांब, अगदी रस्त्यावर पडलेल्या प्लास्टिकच्या पिशव्यांवरूनही तुम्ही घसरून पडू शकता आणि तुमचा मृत्यू होऊ शकतो. वरील रस्त्यावरच्या मृत्यूची नियमित कारणे असल्याने ती अंगवळणी पडली आहेत. लोकल रुळावरच्या मृत्यूंच्या कारणांचीही अशीच वेगळी जीवघेणी साखळी सांगता येईल. ज्या देशातील लोकसंख्या अब्जावधींच्या घरात असते आणि ज्या देशाचा नागरिक हा सर्वात दुर्लक्षित घटक असल्याचे त्या देशातील नागरिकांनीही मनोमन मान्य केलेले असते, त्यांच्या मरणाचे सोयरसुतक धरण्याचे कारणही नसते.

काही वर्षांपूर्वी पावसाळ्यात मुंबई तुंबल्यानंतर केईएम रुग्णालयाच्या एका सर्जन असलेल्या वैद्यकीय अधिकारी आणि डॉक्टरांचा मृत्यू मुंबईतल्या मेनहोलमध्ये पडून झाला होता. मेनहोलमधल्या सफाई कामगारांचे श्वास कोंडून घुसमटणारे मरण आपण नेहमीची बाब म्हणून गृहीत धरलेलेच असते. जन्माचा आनंद जल्लोषात करणार्या आपल्याला मरणाची भीती नसते असे नाही तर आपले मरणही आपण गृहीत धरलेलेच आहे. हे मरणाचे गृहितक आपल्या जगण्याला चिकटून बसलेले आहे, ते ओरबाडून काढणे शक्य नाही. आपल्या जगण्याची काहीही किंमत नाही, ठाण्यामध्ये रिक्षातून जाणाऱ्या तरुणाच्या डोक्यातून इमारतीवरून कोसळलेली लोखंडी सळई थेट आरपार घुसली होती. हे मरणही अनाकलनीय अचानक होते. नारळाच्या झावळ्यांच्या खोपटात साधे वीज मीटरही नसलेल्या गरीब आदिवासीच्या घरावर अचानक 'ईडी' किंवा 'एसीबी'चा छापा पडावा, इतके अर्तक्य होते. एका श्वासाच्या अंतराचीही इथे शाश्वती नाही.

वरील मरणाची कारणे वरवर जरी अकस्मात किंवा विनाकारण दिसत असली तरी त्यातही मानवी वर्तनाचा कार्यकारणभाव स्पष्ट व्हावा. आपल्याकडे 'सामाजिक जीवनातील व्यक्तींची कर्तव्ये' किंवा 'सजग नागरिकत्वाच्या जबाबदाऱ्या' हा विषय शंभरपैकी दहा गुणांसाठी राखीव म्हणून ठेवला जातो. वर्तमानातल्या भवतालाची जबाबदारी घेण्यापेक्षा घडून गेलेल्या इतिहास रंजनात आपल्याला रमायला आवडते. एक माणूस रस्त्यावर थुंकीची पिंक टाकतो, त्यातून पसरणारे बॅक्टेरिया कित्येकांना आजार देऊन यमराजाचे काम सोपे करतात. आता अशी पिंक टाकर्णायाला पुढे जाऊन यातून असेही काही भीषण परिणाम समोर येऊ शकतात याची यत्किंचितही कल्पना नसते. त्याचा मेंदू आणि विचार आताच्या भवतालमध्ये तसा घडलेलाच नसतो, किंबहुना तो तसा घडवलाच जात नाही. लेखाच्या चौथ्या परिच्छेदातील मरणाची काही फुटकळ कारणे पाहिल्यावर ही माणसांच्या बेजबाबदारीचीच यादी असल्याचे स्पष्ट व्हावे. एखादा वायरमन वायरवरील प्रोटेक्शन टेप थोडी सैल सोडून कामात दिरंगाई करून निघून जातो, त्यानंतर दुर्घटना घडते. एखाद्या कारच्या इंजिनातील रस्त्यावर सांडलेल्या ऑईलमुळे एखादे आनंदी कुटुंब अचानक संपून जाते, कारचालक किंवा मालकाला त्याची खबरही नसते. संक्रांतीच्या आनंदाचा पतंगाचा दोर एखाद्याच्या आयुष्याची दोरी कापू शकतो. रस्त्यावरचा एकच खड्डा किंवा उखडलेला पेव्हर ब्लॉक एखाद्यासाठी अखेरचा मैलाचा दगड ठरतो. कर्चयाचे ढीग, वाहनांचे धूर, रस्त्याची धूळसुद्धा मृत्यूचा सांगावा घेऊन येऊ शकते. 'आपले मरण आपल्या हाती नाही' असे बोलून ते दुर्सयांच्या हातातही देण्याची अक्षम्य चूक व्यवस्थेच्या सहजपणाखाली सहजच केली जात आहे. सामाजिक जबाबदारीविषयी इतके बेमुर्तखोर आणि बेजबाबदार आपल्यासारखे आपणच आहोत. आपल्याच एखाद्या बेजबाबदार कृत्यामुळे आपण दुर्सयासाठी वेदनेचा, दुःखाचा आणि मृत्यूचा दूत ठरू शकतो. आपल्याला त्याची कल्पनाही नसते. आपल्यासाठी दुसरा कोणी मरणाचा दूत ठरता कामा नये, असे वाटणे स्वाभाविक असताना आपणही दुर्सयासाठी कळत-नकळत 'काळाची झडप' ठरू नये, याचा विचार प्रत्येकाने स्वतः करायला हवा, एक माणूस, समाजशील प्राणी आणि नागरिक म्हणूनही आपले भवतालाप्रती उत्तरदायित्व आहे.

# न्यूड मेकअप लूकसाठी काही टिप्स



**न्यूड मेकअप लूकचा सध्या खूपच वापर केला जातो. यासाठी ब्लॅक मस्कराचा वापर करा. आपल्याला त्वचेला सूट होईल असा नैसर्गिक रंग आणि गुलाबी रंगाच्या लिप कलरचा वापर करा. आकर्षक दिसण्यासाठी न्यूड मेकअप लूकसाठी कोणत्या टिप्सचा वापर केला पाहिजे, ते जाणून घ्या.**

▮ आपल्या डोळ्यांना नॅचरल लूक देण्यासाठी पापण्यांना ब्लॅक मस्करा लावा आणि केस कुरळे करा.

▮ डोळ्यावरच्या आतील कोपऱ्यापर्यंत काजळ लावा. त्यामुळे पापण्या सुंदर आणि आकर्षक दिसतील.

▮ गालावर नॅचरल चमक येण्यासाठी चीकबोन्सला हायलाइट करा. सध्या न्यूड मेकअप लूकसाठी आपल्या त्वचेला सूट होईल अशा नॅचरल शेडची निवड करा.

▮ यासाठी हलक्या रंगाचा वापर करा. चेहरा चमकण्यासाठी ओठांना हलक्या गुलाबी रंगाची पिंक शेडची लिपस्टिक लावून त्यावर शाईन येण्यासाठी लिप ग्लॉसचा वापर करा. त्यामुळे अजूनच आकर्षक लूक येईल.

▮ न्यूड मेकअप लूकसाठी एकाच रंगाच्या वेगवेगळ्या शेड्सचा वापर करा.

▮ न्यूड शेड्स लावण्याआधी लाईट बेस लावा आणि आवश्यक असल्यास हलक्या हातांनी लूज पावडर किंवा कॉम्पॅक्ट पावडर लावा.

# गरम पाणी पिण्याचे फायदे

**बहुतेक लोक आपल्या दिवसाची सुरुवात चहा किंवा कॉफीच्या गरमागरम कपाने करत असतात. काही लोकांना तर सकाळी उठल्या उठल्या चहा किंवा कॉफी मिळाली नाही, तर त्यांचा अख्खा दिवस वाईट जातो, इतकी त्यांना चहा किंवा कॉफीची सवय झालेली असते. पण या सवयीमुळे कालांतराने बद्धकोष्ठ, पोटदुखी, ॲसिडिटी, पिंपल्स अशा तक्रारी सुरू होतात. असे म्हटले जाते की त्वचा, केस आणि एकंदर शरीराचे आरोग्य सांभाळण्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सकाळी उठल्या उठल्या एक ग्लास गरम पाणी पिण्याची सवयही तुमच्या शरीरातील अनेक विकार मुळापासून दूर करू शकते.**

**सकाळी** उठून नियमितपणे एक ग्लास गरम पाणी प्यायल्याने पचन शक्ती चांगली राहते. तसेच गरम पाणी प्यायल्याने शरीरातील रक्ताभिसरणही चांगले राहते. आपल्या खाण्या-पिण्याच्या अयोग्य सवयींमुळे आपल्या शरीरामध्ये साठत असलेले घातक पदार्थ गरम पाण्याच्या सेवनामुळे बाहेर टाकण्यास मदत होते. तसेच गरम पाण्याच्या नियमित सेवनामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी घटण्यास मदत होऊन वजन कमी होण्यास मदत होते. योगशास्त्राच्या नियमानुसार तीन महिने गरम पाण्याच्या सेवनाने वजन कमी होऊ शकते. याकरिता इतर कोणतीही विशेष पथ्ये पाळण्याची गरज नाही.

काही लोकांना बद्धकोष्ठाचा त्रास होतो. अशा वेळी सकाळी रिकाम्यापोटी गरम पाणी पिणे फायदेशीर ठरू शकते. पुष्कळ महिलांना मासिक धर्माच्या दिवसांमध्ये डोकेदुखी सतावते. त्यावेळी नियमित गरम पाण्याचे सेवन केल्याने डोकेदुखीपासून आराम मिळतो. तसेच या दिवसांमध्ये होणारी पोटदुखी ही गरम पाण्याच्या सेवनामुळे कमी होते.



दररोज सकाळी एक ग्लास गरम पाण्यामध्ये थोडासा लिंबाचा रस घालून प्यायल्याने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते. ज्यांना सतत बारीकसारीक तब्येतीच्या तक्रारी जाणवत असतील त्यांनी गरम पाणी आणि लिंबाच्या रसाचे दररोज सेवन करणे उत्तम. यामुळे त्वचेचे आरोग्य देखील चांगले राहून, त्वचेवर पिंपल्स येणे कमी होते. तसेच गरम पाण्याच्या सेवनाने ॲसिडिटीचा त्रासही कमी होतो. पुष्कळ लोकांच्या खाण्या-पिण्याचे वेळापत्रक किंवा झोपेच्या वेळा अतिशय अनियमित असतात. शिवाय ज्या लोकांना काही ना काही कारणाने सतत प्रवास करावा लागतो. त्यांनाही बाहेरच्या जेवणावरच काम चालवून घ्यावे लागते. परिणामी ॲसिडिटीसारखे विकार पाठीमागे लागतात. अशा वेळी दररोज सकाळी गरम पाणी पिण्याच्या सवयीने ॲसिडिटीचे प्रमाण कमी होते.

# कोरफडीचे ५ गुणकारी फायदे

**कोरफड त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. याच्या नियमित सेवनाने त्वचेसंबंधित अनेक समस्या दूर होतात. जाणून घ्या कोरफडीचे गुणकारी फायदे...**

▮ सतत कॉम्प्युटरसमोर बसल्याने डोळ्यांवर ताण येतो. डोळ्यांचे आरोग्य चांगले राहाण्यासाठी दोन चमचे कोरफडीचा गर एक कप पाण्यात मिसळून त्याने डोळे धुवा. यामुळे डोळ्यांना आराम मिळेल.

▮ चेहऱ्यावर पुटकुळ्या आल्यास कोरफडीचा गर चेहऱ्यावर लावा. थोड्या वेळाने चेहरा साध्या पाण्याने धुवा. यामुळे पुटकुळ्या कमी होतील.

▮ शरीरावर कापल्यामुळे जखम झाली असल्यास त्यावर कोरफडीचा गर लावा.

▮ कोंड्याची समस्या असल्यास दोन चमचे कोरफडीचा गर कंडिशनरसोबत मिसळा. यामुळे कोंड्यापासून सुटका होईल.

▮ दातांच्या हिरड्या मजबूत करण्यासाठी हिरड्यांवर कोरफडीचा गर लावा.

# मासिक पाळी पुढे ढकलताय ?


**सण, समारंभ, पर्यटन किंवा धार्मिक कार्याच्या आड येणारी मासिक पाळी पुढे ढकलण्याचा निर्णय अनेक महिला घेतात. मात्र अशा प्रकारे निसर्गचक्रात हस्तक्षेप करणं चुकीचं आहे. बरंच प्रबोधन होऊनही मासिक पाळीबाबतचे गैरसमज कमी झालेले नाहीत. म्हणूनच महिलांना कृत्रिम पद्धतीने पाळी पुढे ढकलावी लागते. मासिक पाळी पुढे ढकलण्यासाठी गोळ्या घेतल्या जातात. पण या गोळ्यांचे शरीरावर दीर्घकालीन परिणाम होतात.**

▮ मासिक पाळी पुढे ढकलणाऱ्या गोळ्यांच्या सततच्या सेवनामुळे यासंदर्भातल्या नैसर्गिक चक्रावर परिणाम होऊ शकतो. शिवाय महिलांच्या प्रजननक्षमतेवरही याचे घातक परिणाम दिसून येतात.

▮ या गोळ्यांचं सेवन केल्यानंतर पुढचा काही काळ मासिक पाळीदरम्यान मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होण्याची शक्यता वाढते. जवळपास २० टक्के महिलांना हा अनुभव येतो. पुढचे काही महिने मासिक पाळीतून अधिक प्रमाणात रक्त जाऊ शकतं.

▮ या गोळ्या बऱ्याच काळपर्यंत घेत राहिल्यास आरोग्यावर अत्यंत घातक असे परिणाम दिसून येतात. नसांमध्ये रक्ताची गुठळी होण्यासारख्या समस्या जाणवू शकतात. या गोळ्यांमुळे इतर औषधांच्या शरीरावरच्या प्रभावावर विपरित परिणाम होऊ शकतो.

▮ या गोळ्या घेतल्यानंतर इतर काही दुष्परिणाम होऊ शकतात. जुलाब, हातापायांमध्ये गोळे येणं, अवेळी रक्तस्राव होणं हे दुष्परिणाम दिसून येऊ शकतात.



# पनीर कटलेट

**साहित्य :** २०० ग्रॅम पनीर कुस्करून, २ मध्यम आकाराचे कांदे चिरून, १ गाजर किसून, १ वाटी बारीक चिरलेला कोबी, २ बटाटे उकडून कुस्करून, १ चमचा आले-लसूण पेस्ट, १ चमचा मिरची-कोथिंबीर पेस्ट, २ मोठे चमचे कॉर्नफ्लॉवर, गरजेनुसार मिठ, पाव ते अर्धा वाटी तेल, चाट मसाला.

**कृती :** भांड्यात तेल गरम करून त्यावर चिरलेला कांदा घाला. कांदा गुलाबी रंग येईपर्यंत शिजला की त्यावर



आले-लसूण पेस्ट व मिरची-कोथिंबीर पेस्ट घालून ढवळा. वरील मिश्रणावर कोबी, गाजर घालून २-३ मिनिटेच परतवत शिजवा. चायनीज पदार्थांसारखेच जास्त शिजू देऊ नका. आता कुस्करलेले बटाटे, मिठ घालून पुन्हा चांगले ढवळून लगेच गॅस बंद करा. हे मिश्रण एका ताटात पसरवा व जरा थंड होऊ द्या. मिश्रण थंड झाले की त्यात पनीर व कॉर्नफ्लॉवर टाकून मिश्रण एकजीव करा. आता तुम्हाला हव्या त्या आकाराचे कटलेट करा. व नॉनस्टिक पॅनवर जरासेच तेल घालून शॅलो फ्राय करून घ्या. दोन्ही बाजू मध्यम आचेवर साधारण ५-६ मिनिटे शिजवा. कटलेट तयार झाले की गरम असतानाच त्यावर चाट मसाला टाका. नुसते किंवा सॉस किंवा पुदिना चटणीबरोबर याचा आस्वाद घ्या.

**अधिक टिप :**

**▮ या कटलेटमध्ये इतर कोणतेही मसाले न वापरल्याने पनीर व भाज्यांचा अस्सल स्वाद येतो.**

**▮ लहान मुलांना तर खूपच आवडतात. शिवाय कोबीसारखी भाजी खाल्ली जाते.**

**▮ यात अजून कांद्याची पात, किंवा आपल्या आवडीच्या भाज्या थोड्या प्रमाणावर घालू शकता.**

# जाणून घ्या टिकली लावल्याने होणारे फायदे



**टिकलीचाही महिलांच्या १६ शृंगारांमध्ये समावेश असून सौभाग्यवती महिला काही वर्षांपूर्वी कुंकवाचा वापर करत असत. पण कुंकवाचा वापर न करता टिकलीचा वापर सध्या महिलावर्ग मोठ्या प्रमाणात करताना पाहायला मिळतात. महिला चेहऱ्यावर लावण्यात आलेल्या टिकलीमुळे केवळ सुंदरच दिसत नाहीत तर त्याचे अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत. टिकलीचा वापर सामान्यतः महिला ट्रेडिशनल लूकसाठी करतात. पण एका अभ्यासानुसार आरोग्यालाही टिकलीमुळे अनेक फायदे होतात. यामुळेच टिकलीचा वापर अनेक महिला करत आहेत. एवढेच नाही तर वेस्टर्न कपडे परिधान करणाऱ्या महिलाही आपल्या ड्रेसनुसार कलरफुल टिकली वापरण्यास सुरुवात करत आहेत. चेहऱ्यावरील टिकलीमुळे महिला खुपच सुंदर दिसतात आणि त्यामुळे अनेक आरोग्यदायी फायदेही होतात. कपाळावर टिकली लावण्याने अनेक फायदे होतात.**

**कपाळावर** टिकली लावल्यामुळे डोके दुखणे बंद होते. ॲक्युप्रेशर शास्त्रानुसार कपाळावर ज्या ठिकाणी टिकली लावण्यात येते, त्या जागेवर मसाज केल्यास डोकेदुखी तत्काळ बंद होते. टिकली लावलेल्या जागेवर मसाज केल्यास नाकाच्या आसपास ब्लड सर्क्युलेशन चांगल्या पद्धतीने होण्यास सुरुवात होते, ज्यामुळे तुम्हाला खूपच आराम मिळतो.

टिकली दोन्ही भुवयांच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, शरीरातील सर्व नसा त्याच केंद्रावर एकत्र येतात. टिकली लावण्यात येणाऱ्या या जागेला अग्निचक्र या नावाने सुद्धा ओळखले जाते. म्हणूनच टिकली लावल्याने एकाग्रताही वाढते आणि मन शांत राहते. तसेच, टिकली लावल्याने ताणतणावही कमी होतो.

तुम्हाला पूर्ण झोप मिळत नाही आणि त्यामुळे तुम्ही त्रस्त आहात तर टिकली लावणे तुमच्यासाठी खूपच फायदेशीर होऊ शकते. टिकली शरीरच्या वरच्या भागाला शांत ठेवण्यासाठी खूपच फायदेशीर ठरते. कपाळावर टिकली लावल्याने चांगली झोप येते.

टिकली डोळ्यांच्या नसा मजबूत करण्यास खूपच मदत करते. टिकली कपाळ्याच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, त्या ठिकाणच्या नसा आणि डोळ्यांमधील नसा यांच्यात एक कनेक्शन असते. टिकली डोळ्यांच्या नसांना मजबूत करण्यास मदत करते ज्यामुळे तुम्हाला एकदम स्पष्ट आणि साफ दिसण्यास मदत होते. एवढेच नाही तर टिकली लावल्याने आसपासचे मसल्स मजबूत आणि हेल्दी होतात.



तुमच्या चेहऱ्यावर जर सुरकुत्या पडण्यास सुरुवात होत आहे तर टिकली लावण्यास तुम्ही सुरुवात करा. कारण, टिकली लावल्याने चेहऱ्यावर येणाऱ्या सुरकुत्यांपासून सुटका मिळण्यास मदत होते.


# स्मरणशक्ती वाढवण्यासाठी 'हाकिनी योगमुद्रा' उपयुक्त

**नववर्षाचा** उल्लास आता सरला आहे आणि विद्यार्थी वर्गाला आता वेध लागले आहेत ते लवकरच येणार असलेल्या वार्षिक परीक्षांचे. सर्वसाधारणपणे मार्च ते एप्रिल महिन्यांच्या दरम्यान होणार असलेल्या या परीक्षांची तयारी, विद्यार्थी आतापासून करण्यास सुरुवात करीत असतात. पालकही या काळामध्ये मुलांच्या खाण्या-पिण्याची, त्याच्या तब्येतीची काळजी घेण्यामध्ये कोणतीही कसर बाकी ठेवत नाहीत. या काळामध्ये मुलांची स्मरणशक्ती चांगली राहावी याकरिता योग्य आहार, नियमित आणि पुरेशी झोप मुलांना मिळणे आवश्यक असते. यामुळे शारीरिक आणि मानसिक तणाव दूर होण्यास मदत होते. मुलांची स्मरणशक्ती चांगली राहावी, याकरिता योगसाधनेची मदतदेखील घेता येऊ शकेल. मेंदू सक्रिय राहून स्मरणशक्ती चांगली राहावी याकरिता योगसाधनेमध्ये हाकिनी मुद्रा सांगितली गेली आहे. एखाद्या गोष्टीचा विसर पडत असल्यास ही मुद्रा लावून त्या वस्तूचे स्मरण करण्याचा प्रयत्न केल्याने ती गोष्ट आठवण्याची शक्यता मोठी असते. विद्यार्थ्यांच्याखेरीज ज्यांना वारंवार काही ना काही गोष्टी विसरण्याची सवय असते, त्यांच्यासाठी देखील ही मुद्रा लाभदायी आहे. ही मुद्रा करण्यासाठी दोन्ही हातांच्या पाचही बोटांचे अग्रभाग जुळवावे. त्यानंतर डोळे वरच्या बाजूला फिरवून त्यांवर अगदी हलका ताण द्यावा. श्वास घेत आपली जीभ हिरड्यांना टेकवावी. त्यानंतर श्वास सोडत जीभ पूर्वस्थितीत आणावी. ही मुद्रा करताना श्वासोच्छ्वास दीर्घ असावा. विद्यार्थ्यांकरिता स्मरणशक्ती वाढवण्याच्या दृष्टीने ही मुद्रा अतिशय लाभदायक आहे.



# इंटरनेटवरील नको त्या गोष्टींपासून मुलांना असे ठेवा दूर

**आजच्या** डिजिटल जगात, इंटरनेटचा वापर थोरा-मोठ्यापासून ते लहान मुलापर्यंत प्रत्येक व्यक्ती करतो. लहान मुलांना इंटरनेटवर सहसा ऑनलाइन व्हिडीओ किंवा त्यांच्या वयोगटाशी संबंधित कार्टून इत्यादी यूट्यूबवर पाहायला आवडते. मात्र इंटरनेटवर अनेक प्रकारचे कंटेंट उपलब्ध असतात. ज्यामुळे मुले भरकटू शकतात. असे होऊ नये याकरिता मुलांच्या इंटरनेट ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवणे आणि त्यासाठी सुरक्षित पद्धतींचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. तुम्हालाही तुमच्या मुलांचा इंटरनेट वापर सुरक्षित ठेवायचा असेल तर, ही माहिती तुमच्यासाठी. यामध्ये आज आम्ही चुकीच्या कंटेंटपासून मुलांचे संरक्षण करण्याच्या काही सोप्या टिप्स सांगणार आहोत. जाणून घेऊया.



**पॅरेंट्स कंट्रोल्स वापरा :**

आजकाल गुगलसह यूट्यूब आणि इंस्टाग्रामसारख्या अनेक प्लॅटफॉर्मवर पेरेंट्स कंट्रोल सुविधादेखील उपलब्ध आहे. तुमची मुले नियमितपणे वापरत असलेले ॲप्स नियंत्रित करण्यासाठी तुम्ही याचा वापर करू शकता.

**मुलांना इंटरनेट सुरक्षिततेबद्दल शिकवा**

हे सर्वात महत्त्वाचे काम आहे. कारण मुलांच्या ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवणे सोपे काम नाही. अशात, मुलांना इंटरनेटवरील धोक्यांची माहिती देणे आणि त्यांना इंटरनेट वापरण्याच्या योग्य मार्गांची जाणीव करून देणे आवश्यक आहे. यासोबतच मुलांना ऑनलाइन पेमेंट आणि मालवेअरच्या धोक्यांबाबत आवश्यक माहिती दिली पाहिजे.

**स्वतंत्र ई-मेल आयडी तयार करा :**

तुम्ही मुलांसाठी वेगळा ई-मेल आयडी देखील तयार करू शकता, त्यामुळे वेब ब्राऊझिंग दरम्यान अनावश्यक जाहिराती टाळता येतील. यासोबतच तुमची मुलं कोणत्या प्रकारचा कंटेन्ट पाहत आहे याची अचूक माहितीही तुम्हाला मिळेल. त्याच वेळी, नवीन ई-मेल आयडीवरून ब्राऊझरच्या मदतीने तुम्ही असुरक्षित वेबसाइट आणि कुकीज बंद करू शकता.

# वजन घटवण्यासाठी 'पीनट बटर' उपयुक्त

**सँडविचमध्ये** लावण्यासाठी एक अतिशय पौष्टिक 'स्प्रेड' म्हणून 'पीनट बटर' म्हणजेच शेंगदाण्यांपासून तयार केले गेलेले बटर अतिशय लोकप्रिय होऊ लागले आहे. अतिशय पौष्टिक तत्त्वांनी परिपूर्ण असे पीनट बटर वजन घटवण्यासाठीही उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. पीनट बटरमध्ये असणारी प्रथिने, जीवनसत्त्वे आणि क्षार वजन घटवण्यास सहाय्यक आहेत. पीनट बटरच्या सेवनाने भूक लवकर शमत असून, त्यामुळे अन्नाचे सेवन आपोआपच कमी होते. याच्या सेवनाने शरीराची चयापचय शक्ती वाढत असून, त्यामुळेही वजन घटण्यास मदत होते. पीनट बटर पोळीबरोबर, भाकरीबरोबर किंवा गव्हापासून तयार केलेल्या ब्रेडसोबत खाता येऊ शकते. फळे किंवा कच्च्या भाज्यांच्या कापांच्या सोबतही हे बटर खाता येते. सकाळच्या नाश्त्यामध्ये ओटमिल घेत असल्यास किंवा दह्यामध्ये मिसळूनही पीनट बटरचे सेवन करता येते. मात्र वजन घटवताना पीनट बटर आहारामध्ये समाविष्ट करताना त्यामध्ये इतर 'ॲडीटिव्ह' असणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. पीनट बटर बाजारातून आणण्यापेक्षा घरी तयार करणे अधिक चांगले. हे बटर बनवण्यासाठी शेंगदाणे भाजून घ्यावेत आणि त्यांची साले काढून घ्यावीत. त्यानंतर शेंगदाणे मिक्सरमध्ये घालून थोडेसे शेंगदाण्याचे तेल घालावे, त्यानंतर मिक्सर सुरू करून शेंगदाणे तीन ते चार मिनिटे मिक्सरवर वाटावेत. तयार झालेल्या शेंगदाण्याच्या पेस्टला पीनट बटर म्हटले जाते. यामध्ये चवीला थोडेसे मीठ घालावे. तसेच आवडत असल्यास किंचित मध आणि दालचिनीची पूडही यामध्ये घालता येऊ शकते.





# चेहरा उजळण्यासाठी कांदा आणि लसणाचा फेसपॅक

**सुंदर, नितळ, गोरी त्वचा कोणाला नको असते. यासाठी लोक चेहऱ्यावर विविध प्रयोग करत असतात. मात्र कांदा आणि लसूणचा फेसपॅक तुम्ही कधी ट्राय केलाय का?**



**त्वचा उजळण्यासाठी लसूण फायदेशीर** : लसूणमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी६, सेलेनियम, झिंक असते. त्वचेवरील मुरुमे हटवण्यासाठी लसूण फायदेशीर आहे. लसणाच्या पेस्टमध्ये मध मिसळून हा पॅक लावल्यास चेहऱ्यास फायदा होता. पिंपल्सच्या जागी लसूणचा रस लावा, पिंपल्स लवकर बरे होतील आणि डाग राहणार नाहीत.


**त्वचेसाठी वरदान आहे कांदा :** कांद्यामध्ये अनेक व्हिटॅमिन असतात. याशिवाय अँटीऑक्सिडंट्सही असतात. कांद्याच्या रसात अँटी सेप्टिक, अँटी-बॅक्टेरियल यासारखे गुण असतात. ज्यामुळे त्वचेवरील मुरुमे निघून जातात.

**कसा करावा वापर :** तुम्ही रोजच्या डाएटमध्ये कच्च्या कांद्याचा वापर करू शकता. कांदा त्वचेसाठी चांगला. याशिवाय तुम्ही कांदा किसून त्याचा फेसपॅक बनवून वापरू शकता. तसेच कांद्याच्या रसाचाही वापर करू शकता.

# घरगुती लिपस्टिक तयार करणे इतके सोपे

**बाजारात** मिळणारे कॉस्मेटिक महाग तर असतातच पण आपल्या स्कीनवर विपरित परिणाम करणारे असतात. त्यातून ओठ हे तर सर्वात नाजूक असतात, यावर रोज बाजारातील लिपस्टिक लावली तर ओठ काळे पडू लागतात. म्हणून येथे आम्ही सोपी पद्धत सांगत आहोत ज्याने आपण घरी लिपस्टिक तयार करू शकता.

**साहित्य :** एक बीट, १/२ कोकोनट ऑइल, १/२ चमचा मधमाश्यांचे मेण, १/२ चमचा कोको बटर



**कृती :** बिटाचे पातळ काप करून वाळू द्या. डिहायड्रेटरमध्ये हे काप १२० डिग्रीवर ८ तास ठेवून वाळवू शकता. नंतर मिक्सरमधून वाटून पावडर तयार करा. मंद आचेवर एका भांड्यात अर्धा ते १ कप पाणी टाकून त्यात मेण, कोकोबटर, कोकोनट ऑइल आणि बीट पावडर मिसळा. चांगले ढवळा. गडद रंगासाठी अधिक पावडर किंवा वाळलेल्या चेरीज वापरू शकता. घट्ट झाल्यावर मऊ कपड्याने गाळून घ्या. लिप कंटेनरमध्ये हे मिश्रण ओतून घ्या. थंड होऊ द्या. आपले लिपस्टिक तयार झाले. हे पूर्णपणे नैसर्गिक असल्यामुळे ओठ काळे पडणार नाहीत.

# 'ब्लॅक टी'चे असेही फायदे

**ब्लॅक** टीमुळे शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. भारतात सर्वाधिक प्यायले जाणारे पेय म्हणून चहाचा पहिला क्रमांक लागतो. चहा, कॉफी म्हटले की अनेक जण दुधाचा चहा, कॉफीला पसंती देतात. दुधाच्या चहाच्या तुलनेत खूप कमी लोकांना ब्लॅक टी आवडते. तुलनेने ब्लॅक टी चवीला चांगली लागत नसली तरी तिचे अनेक फायदे आहेत. बाजारात अनेक प्रकारच्या ब्लॅक टी उपलब्ध आहेत. घरात बनवली जाणरी ब्लॅक टी लिंबू रस टाकून घेता येते. बाजारात इंग्लिश ब्रेकफास्ट टी, अर्ल ग्रे टी, आसाम टी, दार्जिलिंग टी, निलगिरी टी असे चहाचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत.



काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत एक संशोधन करण्यात आले होते. या संशोधनाचा अहवाल युरोपियन जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये पब्लिश करण्यात आला होता. या अभ्यासानुसार ब्लॅक टीमध्ये विविध प्रकारचे विशेष तत्त्व असल्याचे सिद्ध झाले आहे. ब्लॅक टीमधील चहाचे विशेष तत्त्व पोटात जाऊन मोठा प्रभाव पाडतात. ब्लॅक टीमुळे वजन घटवण्यास मदत होते. तसंच शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. विषारी द्रव्ये शरीरातून बाहेर निघाल्यामुळे कोणताही आजार बळावण्याची शक्यता कमी होते.

टॉक्सिंस शरीरातून बाहेर पडल्यामुळे आरोग्यही उत्तम राहण्यास मदत होते.

चहात ॲण्टी ऑक्सिडेंट सर्वाधिक असतात. अनेक संशोधनांतून संशोधकांनी ब्लॅक टी आणि ग्रीन टीमध्ये प्रोबायोटिक्स तत्त्व आढळून येत असल्याचे सांगितले आहे. प्रोबायोटिक्स तत्त्व शरीरात प्रतिरोधक सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी मदत करतात. ब्लॅक टी वजन नियंत्रणात ठेवून अनेक आजारांपासून बचावही करते.

ब्लॅक टीमध्ये दूध आणि साखर नसल्याने शरीरात फॅट जमा होत नाही. चहातील ॲण्टीऑक्सिडेंट शरीरातील अतिरिक्त चरबी न वाढू देण्याचे काम करते. एका संशोधनातून दिवसांतून तीन वेळा ब्लॅक टी पिण्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहत असल्याचे समोर आले आहे. डोकेदुखी होत असल्यास ब्लॅक टीमध्ये लिंबू टाकून प्यायल्याने डोकेदुखीत आराम मिळतो.



# एसटीच्या सुरक्षेला डिजिटल कवच

## नवीन सीसीटीव्ही प्रकल्पातून प्रवाशांना मिळणार अभेद्य संरक्षण

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

राज्याच्या कानाकोपऱ्यात धावणाऱ्या 'लालपरी'च्या सुरक्षेला आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे बळ मिळणार आहे. दहशतवादी आणि समाजविघातक प्रवृत्तींच्या संभाव्य धोक्यांचा विचार करून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) एक महत्त्वाकांक्षी 'नवीन सीसीटीव्ही प्रकल्प' हाती घेतला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून एसटीच्या बसस्थानकांपासून ते विभागीय कार्यालयांपर्यंत सर्वच महत्त्वाच्या ठिकाणांवर डिजिटल नजरेचे अभेद्य जाळे उभारले जाणार आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पासाठी तब्बल १११ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीच्या सहाय्याने एसटीच्या बसस्थानके, आगार, विभागीय कार्यशाळा, मध्यवर्ती कार्यशाळा, विभागीय कार्यालये तसेच मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी यांसारख्या संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. एकूण ६३३ ठिकाणी तब्बल ७०३५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून, यामुळे एसटीच्या प्रत्येक हालचालीवर सतत डिजिटल नजर राहणार आहे.



या अत्याधुनिक प्रकल्पाची जबाबदारी ई-निविदा प्रक्रियेद्वारे निवडलेल्या टेलिकम्युनिकेशन कन्सल्टंट इंडिया लिमिटेड या अनुभवी संस्थेकडे सोपविण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून प्रकल्पाची अंमलबजावणी वेगाने आणि प्रभावीपणे सुरू असून, या प्रकल्पाचा एकूण कालावधी १ वर्ष निश्चित करण्यात आला आहे. या प्रकल्पाचा मुख्य कणा ठरणारे मध्यवर्ती नियंत्रण कक्ष मुंबई येथे उभारण्यात आले असून, त्याची वापरकर्ता स्वीकृती चाचणी (वअळ) यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे. या नियंत्रण कक्षातून राज्यभरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर केंद्रीकृत पद्धतीने लक्ष ठेवले जाणार आहे. त्यामुळे कोणतीही संशयास्पद हालचाल तात्काळ ओळखून आवश्यक ती कार्यवाही करता येणार आहे.

प्रकल्पाच्या पायलट टप्प्यात मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर विभागातील ६४ महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही प्रणाली यशस्वीरित्या बसविण्यात आली आहे, ज्यामुळे सुरक्षेची नवी दिशा निश्चित झाली आहे. उर्वरित २७ विभाग, तसेच विविध कार्यशाळा आणि कार्यालयांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याची पुढील कार्यवाही सध्या वेगाने सुरू आहे. या प्रकल्पामुळे एसटीच्या बसस्थानकांवर आणि कार्यालयांमध्ये सुरक्षिततेचे नवे पर्व सुरू होणार आहे. प्रवाशांचा विश्वास अधिक दृढ होणार असून, कोणत्याही अनुचित घटनांवर त्वरित नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे.

'नवीन सीसीटीव्ही प्रकल्प' हा केवळ कॅमेरे बसविण्याचा उपक्रम नसून, तो एसटीच्या सुरक्षेला डिजिटल कवच देणारा आणि प्रवाशांच्या विश्वासाला नवे बळ देणारा एक ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे. असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे. यामुळे ह्यलालपरीह्न चा प्रवास आता केवळ वेगवानच नव्हे, तर अधिक सुरक्षित, विश्वासार्ह आणि तंत्रज्ञानसज्ज होणार आहे. हीच या प्रकल्पाची खरी यशोगाथा ठरणार आहे. असे मत मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केले.

## मध्य रेल्वेने भंगार विक्रीतून कमावले ₹. ४०४ कोटी

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मध्य रेल्वेने शून्य भंगार स्थिती साध्य करण्यासाठी महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. त्यानुसार आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील ११ फेब्रुवारी २०२६ पर्यंत भंगार विक्रीतून ४०४.७२ कोटी रुपये मिळवले आहेत. हे उत्पन्न मागील आर्थिक वर्षाच्या याच कालावधीत विक्री झालेल्या रक्कमेपेक्षा अंदाजे २.८१ टक्कने वाढले आहे. मध्य रेल्वेच्या स्टोअर्स विभागाने कुर्ला कटिंग यार्ड, ट्रॅक्शन मशीन वर्कशॉप (नाशिक), परळ वर्कशॉप, मनमाड वर्कशॉप, तसेच मध्य रेल्वेच्या पाचही विभागांमध्ये दुर्गम आणि विखुरलेल्या ठिकाणी पडलेल्या भंगार साहित्याची ओळख पटवून त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी विशेष मोहिम हाती घेतली आहे. या मोहिमेमुळे भंगार विक्री कामगिरीत उल्लेखनीय वाढ झाली आहे. विविध श्रेणीतील भंगार आणि इतर साहित्याची विल्हेवाट लावून ही महत्त्वपूर्ण कामगिरी साध्य करण्यात आली आहे. यामध्ये ४० हजार १७७ मेट्रिक टनचे कायमस्वरूपी भंगार, २ लाख ५५ हजार ३१८ स्लीपर, २५,७९० मेट्रिक टन फेरस भंगार तसेच ३ हजार ३२५ मेट्रिक टनचे नॉन-फेरस भंगार आणि ४७ लोकोमोटिव्ह, ७० कोच आणि ११० वॅगन यांचा समावेश आहे. विभागांमध्ये, भुसावळ विभाग आघाडीवर आहे. या विभागाने ११ फेब्रुवारी रोजी ९७.७२ कोटी रुपयांची सर्वाधिक भंगार विक्री नोंदवली आहे.

## वसई-विरार शहर महानगरपालिकेची विशेष मोहीम

### रस्त्यांवरील विनामालक वाहनांवर लवकरच कारवाई

**■वसई। प्रतिनिधी,**

शहरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांच्या कडेला वषार्नुवर्षे धुळ खात पडून असलेल्या विनामालक व भंगार वाहनांमुळे वाहतूककोंडी, अस्वच्छता आणि सुरक्षेचे प्रश्न गंभीर बनले आहेत. या पार्श्वभूमीवर वसई विरार महानगरपालिकेने अशा वाहनांवर ठोस कारवाई करण्यासाठी धोरण निश्चित करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. लवकरच विशेष मोहिम राबवून ही वाहने हटविण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

शहरात नागरीकरणाचा वेग वाढत असताना वाहनांची संख्याही झपाट्याने वाढत आहे. आधीच अरुंद असलेल्या रस्त्यांवर दोन्ही बाजूंनी उभ्या असलेल्या भंगार वाहनांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. काही ठिकाणी ही वाहने महिनोनमहिने न हलवल्याने त्याभोवती घाणीचे ढीग साचले आहेत. सफाई कर्मचाऱ्यांना साफसफाई करणेही कठीण होत असल्याने परिसर अस्वच्छ होत आहे.

मनवेलपाडा तलाव परिसर, मोरेगाव तलाव रस्ता, नारंगी बायपास रोड, विरार स्टेशन रोड आदी भागांत मोठ्या प्रमाणावर बेवारस वाहने आढळुन येत आहेत. रात्रीच्या वेळी रस्त्याच्या कडेला उभी असलेली ही वाहने अपघातांना आमंत्रण देत असल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. काही ठिकाणी या वाहनांचा गैरवापर होऊन ती नशेखोरांचे अड्डे बनत असल्याचेही निदर्शनास आले आहे.

यापूर्वी महापालिकेने दंडात्मक कारवाईचे आदेश जाहीर केले होते. जप्त वाहनांसाठी दररोज दंड आकारण्याचा तसेच वाहनप्रकारानुसार निश्चित दंड वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात अंमलबजावणी मर्यादित प्रमाणातच झाली. तरीही आत्तापर्यंत 143 वाहनांवर कारवाई करून ती उचलण्यात आल्याची माहिती परिवहन विभागाने दिली आहे.

वाहतूक विभागानेही संयुक्त कारवाईला सुरुवात केली आहे. वाहतुकीस आडथळा ठरणारी तसेच आग लागण्याचा धोका असलेली वाहने प्राधान्याने हटवली जात आहेत. नगरिकांनीही या वाहनांची माहिती प्रशासनाला द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

रस्ते मोकळे करणे, शहर स्वच्छ ठेवणे आणि अपघाताचा धोका कमी करणे या उद्देशाने ही मोहीम राबवली जाणार आहे. त्यामुळे अनेक वर्षे प्रलंबित असलेला विनामालक वाहनांचा प्रश्न आता मार्गी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## मुंबई-पुणे महामार्गावर कंटेनरनं घेतला पेट, चालत्या वाहनातून ड्रायव्हरने मारली उडी अन्...



**चालत्या कंटेनर ट्रकला भीषण आग**

कंटेनर ट्रकला भीषण आग लागताच, चालकाने आपला जीव वाचवण्यासाठी सतर्कता दाखवली. चालकाने चालत्या ट्रक कंटेनरमधून उडी मारली, सुदैवाने यात कसलीही जीवितहानी झाली नाही. कंटेनरला आग लागल्याचे बघताच, चालकाने सतर्कता दाखवत गाडी थांबवली आणि बाहेर उडी मारली.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई-पुणे महामार्गावरती काही दिवसांपूर्वी टँकर पलटी झाला होता, यामुळे महामार्गावरील वाहतूक तीन दिवस ठप्प राहिली होती. त्यानंतर आता पुणे- मुंबई महामार्गावर एका चालत्या कंटेनर ट्रकला भीषण आग लागली होती. सुदैवाने यात कसलीही जीवितहानी घडली नाही.

**चालकाने उडी मारून वाचवला जीव**

या घटनेचा व्हिडिओ सध्या समोर आला आहे, ज्यामध्ये कंटेनर आगीच्या ज्वाळांनी वाढलेला दिसतो. आगीचे नेमकं कारण समोर आलेलं नाही. गाडीचे इंजिन आणि ब्रेक सिस्टम अधिक गरम झाल्याने एक्सप्रेसवेच्या चढ-उतारांवर याआधी देखील अशीच घटना घडली होती.

या प्रकरणाची माहिती मिळताच, महामार्ग पोलीस आणि आयआरबी एंजल रेस्क्यू पथक घटनास्थळी पोहोचले आणि मोठ्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. आगीमुळे वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाल्याची माहिती समोर आली. सध्या वाहतुकीची परिस्थिती नियंत्रणात आहे.

## ठाण्यात १६ वर्षीय मुलीनं इमारतीच्या १४व्या मजल्यावरून उडी मारत संपवलं जीवन, नोटमध्ये लिहिलं 'कुटुंबावर ओझं...'

**सुसाईड नोटमध्ये काय?**

घटनास्थळावर आढळून आलेल्या सुसाईड नोटमध्ये 'कुटुंबाला माझे होऊ नये, आनंदी राहावे,'असं नमूद केलं होतं अशी माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली होती.पुढे त्यांनी सांगितलं की, 'मुलीला ओवळे परिसरातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, जिथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. अपघाती मृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. तिच्या कुटुंबाचे आणि शेजाऱ्यांचे जबाब नोंदवले जात आहेत, असे त्यांनी सांगितले, सध्या या प्रकरणात कोणताही घातपात असल्याचा संशय नाही, अशी माहिती दिली.

**■ठाणे। प्रतिनिधी,**

ठाणे शहरातून एक धक्कादायक प्रकार उघडकीस आलं आहे. एका किशोरवयीन मुलीनं उंच इमारतीवरून उडी मारून आपलं जीवन संपवलं आहे. एवढंच नाहीतर तिने एक सुसाईड नोट देखील लिहिली, 'कुटुंबावर ओझे होऊ नका, आनंदी राहा', असं त्यात नमूद केलं आहे. या घटनेनं परिसर हादरून गेला आहे.

**१६ वर्षीय मुलीने उंच इमारतीवरून उडी मारत संपवलं जीवन**

ठाणे पश्चिम येथे सोमवारी १६ वर्षीय मुलीने उंच



इमारतीवरून उडी मारत आपलं जीवन संपवल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्याने दिली आहे. मोघारपाडा परिसरातील शुभसंकेत सहकारी गृहनिर्माण संस्था या इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून उडी मारतं जीवन संपवलं. आत्महत्या केलेली तरुणी ही अकरावीच्या वर्गात शिक्षण घेत होती.

## जालन्यात विवाहितेचा अमानुष छळ, माहेरहून पैसे आणण्यास टाकला दबाव

### पीडितेनं गळफास घेत संपवलं जीवन




**सासरच्यांकडून घर बांधण्यासाठी महिलेला ५० हजारांची केली मागणी**

तक्रारीनुसार, रिंकी या मृत महिलेचा ३१ डिसेंबर २०१८ रोजी महेंद्र शरद मेखे नावाच्या तरुणाशी विवाह झाला होता. लग्नानंतर दोघांचा सुखाचा संसार सुरु होता, पण मध्येच घर बांधण्याचा विषय निघाला असता, नवरा महेंद्र, मामेसासरे अनंता घानार आणि मामेसासू सुनिता अनंता घानार यांनी घर बांधण्यासाठी माहेरहून ५० हजारांची मागणी केली. सासरच्यांनी तिला मानसिक आणि शारीरिक छळ केल्याचा आरोप केला, असं तक्रारीत नमूद केलं.

**■जालना। प्रतिनिधी,**

जालन्या जिल्ह्यात एका विवाहित महिलेनं राहत्या घरात गळफास घेत आपलं जीवन संपवलं. या प्रकरणी सासरच्या तिघांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आत्महत्या केलेल्या महिलेचं नााव रिंकी महेंद्र मेखे असे आहे. संबंधित प्रकरणात विजेंद्र सुरेश गांजले यांनी जालना तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

**मानसिक त्रासाला कंटाळून पीडितेनं गळफास घेतला**

त्यानंतर तिने आपलं माहेर गाठलं आणि आईसह नातेवाईकांना ही घटना सांगितली, पण नातेवाईकांनी तिला पुन्हा सासरी पाठवलं होतं. नंतर काही दिवसांपासून पुन्हा तिचा छळ वाढल्याची माहिती समोर आली, तिनं तिच्या बहिणींना देखील ही गोष्ट सांगितल्याची माहिती फिर्यादीत नमूद केलं होतं. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास रिंकीने गळफास घेऊन आत्महत्या केली.

आत्महत्येची माहिती विजेंद्र गांजले यांना मिळाली असता, गांजले कुटुंबिय जालनात दाखल झाले होते. रिंकीला शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची माहिती मिळाली, त्यानंतर गांजले कुटुंबीय जालन्यात दाखल झाले. त्यावेळी रिंकीला शासकीय रुग्णालयात दाखल केल्याचे समजले. कुटुंबिय रुग्णालयात दाखल झाले असता, डॉक्टरांनी तिचा तपास करत तिला मृत घोषित केलं. या प्रकरणी नवरा महेंद्र, अनंता घानार आणि सुनिता घानार यांच्यावर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा पुढील तपास सुरु केला आहे.

## नागपूरात खळबळ!

### नगरसेविकेच्या पतीवर हल्ला

**■नागपूर। प्रतिनिधी,**

नागपुर जिल्ह्यात एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. यामध्ये भारतीय जनता पक्षाच्या नवनिर्वाचित नगरसेविका मानसी शिमले यांचे पती नितीन शिमले यांच्यावर सशस्त्र हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यामध्ये नितीन शिमले गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास जुनी शुक्रवारी परिसरात घडली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठत अधिक तपास सुरु केला आहे. परंतु या घटनेने राज्यात खळबळ उडाली आहे.

**नितीन शिमलेसह भाजप कार्यकर्ता गंभीर जखमी**

कोतवाली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नितीन शिमले आणि आरोपी सोनू ठाकरे उर्फ पैलवान यांच्यात पैशाच्या व्यवहारावरून वाद होते. यावरून सोनू पैलवानने रविवारी रात्री जुनी शुक्रवारी चौकात नितीन शिमले याच्यावर चाकुने हल्ला केला. या हल्ल्यात शिमले गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलिस लगेच घटनास्थळावर पोहोचले. त्यांनी जखमी नितीन यांना रुग्णालयात दाखल केले. तर मारेकरी सोनू ठाकरे हा घटनास्थळावरून फरार झाला असून सध्या पोलीस सोनू पैलवानचा शोध घेत आहे. दरम्यान, जुन्या वादातून मित्र महेश ठाकरेने भाजपाच्या नगरसेविका मानसी शिमले यांचे पती नितीन शिमले यांच्यावर प्राणघातक हल्ला केला आहे. धारधार शस्त्राने हा हल्ला केल्याने शिमले गंभीर जखमी झाले आहेत. कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जुनी शुक्रवारी परिसरातील ही घटना घडली. जुन्या हत्येच्या प्रकरणात नितीन शिमले व महेश ठाकरे आरोपी होते. सध्या नितीन शिमले यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरु असून पोलिसांचा तपास सुरु आहे.

## बंद फ्लॅटवर चोरट्यांची नजर लाखो रुपयांचा ऐवज गायब

**■डोंबिवली। प्रतिनिधी,**

शहरात अलीकडे घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे. भरवस्तीतील बंद घरांवर लक्ष ठेवून चोरट्यांकडून हात साफ केला जात असल्याच्या घटना समोर येत आहेत. अशाच प्रकारची एक गंभीर घटना देसलेपाडा परिसरात उघडकीस आली असून, लग्नासाठी गावी गेलेल्या कुटुंबाच्या फ्लॅटमध्ये मोठी चोरी झाल्याचे समोर आले आहे. देसलेपाडा येथील आर.पी. रेसीडेन्सीमध्ये राहणारे अशिष रामधनी यादव हे आपल्या कुटुंबासह उत्तर प्रदेशातील मूळ गावी विवाह सोहळ्यासाठी गेले होते. घर सुरक्षित राहावे यासाठी त्यांनी फ्लॅटची चावी आपल्या बहिणीकडे सोपवली होती. ९ फेब्रुवारी रोजी घरात कीटकनाशक फवारणीचे काम पूर्ण करण्यात आले होते आणि त्यानंतर घर व्यवस्थित बंद करण्यात आले होते. दरम्यान, १५ फेब्रुवारी रोजी वॉटर फिल्टरच्या दुरुस्तीसाठी तंत्रज्ञ येणार असल्याने यादव यांच्या बहिणी मायादेवी आणि त्यांचे पती दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास फ्लॅटवर पोहोचले. मात्र तेथे पोहोचताच सेफ्टी डोअर तसेच मुख्य दरवाजाची कडी तुटलेल्या अवस्थेत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घरात प्रवेश केल्यावर दोन्ही शयनकक्षांतील कपाटे उघडी आढळली. लॉकर फोडण्यात आले होते आणि घरातील साहित्य विस्कळीत अवस्थेत पडलेले होते. या प्रकाराची माहिती तातडीने अशिष यादव यांना देण्यात आली. प्राथमिक तपासानुसार, कपाटात ठेवलेले सुमारे ४० तोळे सोन्याचे दागिने तसेच अंदाजे ५० हजार रुपयांची रोकड चोरीस गेल्याचे स्पष्ट झाले आहे. दिवसाढवळ्या घडलेल्या या धाडसी घरफोडीमुळे परिसरात अस्वस्थता निर्माण झाली आहे.



**गुन्हा दाखल...**
**सीसीटीव्ही तपास सुरू**

घटनेची माहिती मिळताच मानपाडा पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. अज्ञात व्यक्तींविरोधात घरफोडीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. परिसरातील सीसीटीव्ही कॅमऱ्यांचे फुटेज तपासले जात असून संशयितांचा माग काढण्यासाठी पथके कार्यरत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. लग्नसराई आणि सुट्ट्यांच्या काळात अनेक कुटुंबे बाहेरगावी जात असल्याने बंद घरांवर चोरट्यांची नजर असते. त्यामुळे नागरिकांनी घर सुरक्षिततेसाठी अतिरिक्त खबरदारी घ्यावी आणि मौल्यवान वस्तू बँक लॉकरमध्ये ठेवाव्यात, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## 'व्हॅलेंटाईन डे'ला चक्क शिक्षकाने विद्यार्थिनीला केला प्रपोज

### 'तू का आली नाहीस म्हणत...'

**नेमकं प्रकरण काय?**

१४ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास संबंधित शिक्षकाने विद्यार्थिनीला वगार्बाहेर बोलविले होते. भीतीपोटी मुलगी तीन मैत्रिणींना सोबत घेऊन बाहेर गेली. परंतु शिक्षकाने इतर तिघींना वर्गात पाठवून पीडित मुलीला थांबवले आणि म्हणाला, ३मी तुला चार दिवस बोलवत होतो, तू का आली नाहीस? रात्री तीन वाजता व्हॉट्सअॅपवर ऑनलाईन का असतेस? मी तुझ्यावर प्रेम करतो३, एवढंच नाहीतर पीडित मुलीचा हात पकडल्याचा आरोप आहे.

**■सातारा। प्रतिनिधी,**

सातारा जिल्ह्यात कराड तालुक्यातील मलकापूर शहरात 'व्हॅलेंटाईन डे' ला शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारी घटना घडली आहे. इयत्ता नववीत शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीला एका शिक्षकानेच 'प्रपोज' करून तिचा विनयभंग केल्याचा प्रकार समोर आला आहे. सदर प्रकरणी पीडित मुलीच्या फियार्दीवरून कराड शहर पोलीस ठाण्यात संबंधित शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलगी मलकापूर शहरातील एका शाळेत नववीच्या वर्गात शिक्षण घेत आहे.

**शिक्षकाविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

घाबरलेल्या मुलीने हात झटकून वर्गात धाव घेतली. ही घटना तिने मैत्रिणी व कुटुंबीयांना सांगितल्यानंतर कुटुंबीयांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. रविवारी कराड शहर पोलीस ठाण्यात शिक्षकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## तरुणीचे बॉयफ्रेंडशी प्रेमसंबंध अन् लग्न दुसऱ्याशी

### प्रियकराने नवऱ्याला 'ते' फोटो पाठवले, नंतर कपडे काढून मारलं

**■चंद्रपूर। प्रतिनिधी,**

चंद्रपूर जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका तरुणाने प्रेयसीच्या दुसऱ्या मित्राला व्हॉट्सअॅपद्वारे फोटो पाठवले, यामुळे तरुणीचा विवाह देखील मोडीत निघाला आहे. संतापलेल्या कुटुंबातील सदस्यांनी त्याला बेदम मारहाण केली आणि हे प्रकरण थेट पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचले. तीन वर्षांच्या नातेसंबंधानंतर तरुणीने दुसऱ्याच तरुणाशी विवाह करण्याचा निर्णय घेतला होता, अशातच तरुणाने प्रेयसीचा फोटो दुसऱ्या पुरुषाला पाठवला ज्याच्यासोबत तिचे लग्न होणार होते.

**नवसागर बोरकरचे २३ वर्षीय तरुणीशी प्रेमसंबंध**

नागभीड तहसील तळोधी पोलीस ठाण्यातील सावरगाव येथील नवसागर बोरकर (२६) याचे

**तरुणाला दोरीने बांधून जबर मारहाण**

संबंधित प्रकरणात संतापलेल्या तरुणीच्या सहा जवळच्या नातेवाईकांनी तरुणाला दोरीने बांधून बेदम मारहाण केली. ही घटना १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी घडल्याचे वृत्त आहे. पीडितेनं तक्रार करून तळोधी बाळापूर पोलिसांनी त्याच्यावर हल्ला करणाऱ्या सहा पुरुषांविरुद्ध गुन्हा दाखल केल्याचं वृत्त समोर आले.


गेल्या तीन वर्षांपासून त्याच्याच गावातील २३ वर्षीय तरुणीशी प्रेमसंबंध होते. पीडित नवसागर म्हणतात की, त्याची प्रेयसी अनेकदा लग्नाबद्दल बोलायची आणि वारंवार त्याच्याकडे पैशांची मागणी करायची. नवसागर तिला ऑनलाईन तर कधी रोख पैसे देखील द्यायचा अशी माहिती समोर आली आहे.

**दुसऱ्या तरुणाला दोघांचे पाठवले फोटो**

प्रेयसी दुसऱ्याच तरुणाशी बोलायची आणि नवसागरकडे दुर्लक्ष करायची. नवसागरला हे लक्षात आल्यानंतर त्याने तिच्याशी संपर्क साधणे बंद केले आणि पैशांची मागणी केली, तिने पैसे परत देण्यास नकार दिला. संतापलेल्या नवसागर बोरकरने ११ फेब्रुवारी रोजी प्रेयसीचे ज्या तरुणाशी प्रेमसंबंध होते त्या तरुणाला दोघांचे फोटो पाठवले.

दरम्यान, १२ फेब्रुवारी रोजी दुपारी ०१:३० वाजता, शेतातील काम संपवून ट्रॅक्टरने गावी परतताना महिलेचे जवळचे नातेवाईक सोमेश्वर ठिकरे, प्रकाश ठिकरे आणि वाढोना येथील रहिवासी असलेले घोनमोडे यांनी एका हॉटेलजवळ तरुणाला लाथा बुक्क्यांनी मारहाण केली, नंतर त्याला दोरीने बांधून त्याचे कपडे फाडले.

अनिल ठिकरे यांच्या पत्नीने तरुणाला चप्पलने बेदम मारले, त्यांचा मुलगा राहुल ठिकरे यांनी त्याच्या डोक्यावर पाणी ओतून बेदम मारहाण केली. या घटनेची माहिती मिळताच वडील गुरुदास बोरकर, चुलत भाऊ दिनेश बोरकर, स्वप्नील बोरकर यांनी त्याला ठिकरे कुटुंबियांच्या तावडीतून कसेबसे सोडवले. पोलिसांनी सावरगाव येथील रहिवासी सोमेश्वर ठिकरे, प्रकाश ठिकरे, प्रमोद घोनमोडे, अनिल ठिकरे, राहुल ठिकरे, अनिलची पत्नी आणि आई यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com